cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com




बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–२९२ | शुक्रवार, दि.१४ फेब्रुवारी | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### सत्कारावरून राजकिय धूळवड

यंदाचे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन नवी दिल्लीत २१ फेब्रुवारी ते २३ फेब्रुवारी असे तीन दिवस होणार आहे. या संमेलनाच्या अध्यक्षा लोकसाहित्याच्या अभ्यासिका डॉ. तारा भवाळकर आहेत तर स्वागताध्यक्ष ज्येष्ठ नेते शरद पवार आहेत. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा केंद्र सरकारकडून मिळाला आहे, त्यामुळे संमेलनात आनंदाचे वातावरण आहे. शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनाही समक्ष भेटून संमेलनाचे निमंत्रण दिले आहे. संमेलनात विविध कार्यक्रम होणार आहेतच पण या संमेलनाच्या पार्श्वभूमीवर सोमवारी महाराष्ट्र सदनात महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना 'महादजी शिंदे राष्ट्रगौरव' पुरस्कार शरद पवार यांच्या हस्ते व ज्योतिरादित्य सिंधिया, मुरलीधर मोहोळ, शिल्पकार राम सुतार आदी मान्यवरांच्या उपस्थितीत देण्यात आला.

# शेतकऱ्यांना बसणार सरकारी धोरणाचा फटका

## गहू विक्रीचा कोटा दीड लाख टनांवरून ४ लाख टन केला, हमीभावा पेक्षा बाजार दर कमी करण्यासाठी सरकारचा डाव

**पुणे । प्रतिनिधी**

**गव्हाचा बाजारभाव सध्या हमीभावापेक्षा जास्त आहे. नवा गहू बाजारात येण्याच्या आधी बाजार भाव हमीभावापेक्षा कमी करण्याचा डाव सरकारने आखला. हमीभावापेक्षा दर कमी झाल्याशिवाय सरकारला खरेदी करता येणार नाही. त्यासाठी सरकारने ई लिलावातून आठवड्याला गहू विक्रीचा कोटा दीड लाख टनांवरून ४ लाख टनांपर्यंत वाढवला. गव्हाची विक्री करून हमीभाव दर २ हजार ४२५ रुपयांपेक्षा कमी करण्याचा प्रयत्न करत आहे. याचा फटका मात्र शेतकऱ्यांना बसणार आहे.**

सरकारला मागील दोन वर्षांमध्ये गहू खरेदीचे उद्दीष्ट साध्य करता आले नाही. तसेच सरकारकडे सध्या गहू आणि तांदळाचा कमी स्टॉक उपलब्ध आहे. त्यामुळे यंदा सरकारला खरेदी वाढवावी लागणार आहे. पण सध्या गव्हाचे भाव हमीभावापेक्षा जास्त आहेत. हे भाव कमी करण्यासाठी सरकार प्रयत्न करत आहे. त्यासाठी स्टॉकमधील जास्त गहू सरकार खुल्या बाजारात विकत आहे. तर



दुसरीकडे विक्रमी उत्पादनाचा अंदाजही सरकारने व्यक्त केला. देशात यंदा गव्हाचा पेरा वाढला आहे. तसेच वातावरण आतापर्यंत पिकाला पोषक आहे. त्यामुळे यंदा देशात विक्रमी उत्पादन होईल, असा अंदाज सरकारने व्यक्त केला. देशातील बाजारात मागील काही महिन्यांपासून गव्हाच्या भावातील तेजी कायम आहे. गव्हाचे भाव हमीभावापेक्षा अधिक आहेत. हे भाव कमी करण्यासाठी सरकारने स्टॉकमधील गहू ई लिलावाच्या माध्यमातून आठवड्याला विकायला सुरुवात केली.

पान २ वर

### ३०० लाख टन गहू खरदीचे उद्दीष्ट

सरकारने यंदा ३०० लाख टन गहू खरदीचे उद्दीष्ट ठेवले आहे. पंजाब आणि हरियानात खरेदी होणारच आहे. शिवाय सरकारने उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, बिहार, गुजरात आणि राजस्थानमध्येही गहू खरेदी वाढविण्याचे या राज्यांना सूचवले आहे. केंद्रीय अन्नमंत्री प्रल्हाद जोशी यांनी या सूचना केल्या आहेत. मागच्या हंगामात या पाच राज्यांमध्ये १६२ लाख टन गहू खरेदीचे उद्दीष्ट ठेवण्यात आले होते. मात्र केवळ ७० लाख टनांचीच खरेदी करता आली. यंदा खरेदी वाढवण्यासाठी सरकारने प्रयत्न सुरु केले आहेत.

# अखेर मणिपूरमध्ये राष्ट्रपती राजवट लागू !

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**अंतर्गत संघर्षामुळे पेटलेल्या मणिपूरमध्ये अखेर राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली आहे. एन बिरेन सिंह यांनी त्यांच्या मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिल्यानंतर केंद्र सरकारने हा निर्णय घेतला आहे. मणिपूरचे राज्यपाल अजय कुमार भल्ला आणि निमलष्करी दलाच्या अधिकाऱ्यांची राजभवनात बैठक झाली. यावेळी अधिकाऱ्यांनी त्यांना केंद्रीय राखीव पोलीस दलच्या तैनाती आणि ऑपरेशनल कारवाईंची माहिती दिली.**

मणिपूरमध्ये मागच्या दोन वर्षांपासून तणावजन्य परिस्थिती आहे. आरक्षणामुळे दोन समाजामध्ये वाद पेटलेला आहे.



> **राज्य दोन भागात विभागले**
>
> मणिपूरमध्ये २०२३ पासून जातीय हिंसाचार सुरु आहे. राज्य दोन हिस्स्यांमध्ये वाटल्या गेल्याची चर्चा आहे. डोंगरी भागात कुकी या समुदायाचे वर्चस्व आहे. आरक्षण आणि अनुदानाच्या मुद्द्यावरुन मणिपूरमध्ये जातीय हिंसाचार सुरू झाला होता.

जाळपोळ, मारामाऱ्या, हल्ले, मोर्चे अशा घाटना मणिपूरमध्ये सातत्याने घडताना दिसून येत आहेत. त्यातच महिलेची नग्न धिंड काढल्याचा प्रकार समोर आला होता.

पान २ वर

# सोलापूर-संभाजीनगर, येडशी-जालना रेल्वेमार्गाचे पुन्हा होणार सर्व्हेक्षण

## खा.बजरंग सोनवणेंनी रेल्वेमंत्र्यांची भेट घेत केली चर्चा, रेल्वेमंत्र्यांनी दिले सर्व्हेक्षणाचे आदेश


**बीड । प्रतिनिधी**

**दि.१० फेब्रुवारी रोजी येडशी–बीड–जालना आणि धाराशिव–बीड–छ. संभाजीनगर हा रेल्वेमार्ग मंजूर करावा, यासाठी, खा.बजरंग सोनवणे यांनी दि.१० फेब्रुवारी रोजी दिल्ली येथे केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेतली होती. यानंतर पुन्हा दि.१३ रोजी भेट घेवून दक्षिण–उत्तर दिशाना जोडण्यासाठी दोन्ही मार्ग महत्वाचे असल्याचे पटवून दिले. यानंतर रेल्वेमंत्री यांनी तातडीने सर्व्हेक्षण करण्याचे आदेश विभागाला दिले आहेत.**

अहिल्यानगर–परळी रेल्वेमार्गाचे काम बीडपर्यंत आले असून हा मार्ग परळीपर्यंत जोडल्याने पुर्व–पश्चिम विभाग



जोडले जात आहेत. तर दक्षिण–उत्तर दिशांना बीड रेल्वेने जोडण्यासाठी दि.१३ फेब्रुवारी रोजी खा. बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री आश्विनी वैष्णव यांची



संसद भवन कार्यालयात भेट घेतली. यावेळी दक्षिण–उत्तर दिशांना जोडण्यासाठी येडशी–बीड–जालना आणि धाराशिव–बीड–छ. संभाजीनगर हा रेल्वेमार्ग कसा महत्वाचा आहे, हे पटवून दिले. हा मार्ग जोडला तर मराठवाड्यात बीड हे मध्यभागी येवून बीडचा विकास झपाट्याने होईल. याठिकाणी मोठे उद्योग व्यवसाय नाहीत. रेल्वेमार्ग जोडला तर येथील उद्योग व्यवसायाला चालना मिळेल आणि येथील नागरिकांच्या हाताला काम मिळेल, असे म्हटले. लोकसभा निवडणूकीच्या विजयानंतर तातडीने अहिल्यानगर परळी रेल्वेमार्गाला गती देण्यासाठी बैठक घेत कामाला कालमर्यादा ठरवून दिली होती. आता अहिल्यानगर बीड अशी रेल्वे धावू लागली असून येत्या काही दिवसात बीड–अहिल्यानंतर रेल्वे सुरू होणार आहे. दरम्यान, येडशी–बीड–जालना आणि धाराशिव–बीड–छ. संभाजीनगर हा रेल्वेमार्ग मंजूर करावा, यासाठी दि.१० फेब्रुवारी रोजी केंद्रीय रेल्वेमंत्र्यांची भेट घेवून चर्चा केली

पान २ वर

### काँग्रेस प्रदेशाध्यक्षपदी हर्षवर्धन सपकाळ

मुंबई : काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष म्हणून विदर्भातील हर्षवर्धन सपकाळ यांची निवड करण्यात आली. दिल्ली येथून काँग्रेसकडून गुरूवारी सायंकाळी सपकाळ यांच्या नावाची घोषणा करण्यात आली. कोल्हापूरातील काँग्रेस नेते सतेज पाटील, सांगलीचे विश्वजीत कदम यांची नावेही प्रदेशाध्यक्षपदासाठी चर्चेत होती. पण अखेर सर्व चर्चांना पूर्णविराम देऊन काँगेसकडून हर्षवर्धन सपकाळ यांच्या नावाला पसंती मिळाली. काँग्रेस अध्यख मल्लिकार्जून खर्गे यांनी सपकाळ यांच्या नावाची घोषणा केली. सपकाळ हे विदर्भातील काँग्रेसचे नेते आहेत. तसेच ते विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या

पान २ वर

# महादेव मुंडे हत्या प्रकरणाचा तपास करण्यासाठी एसपींकडून पथकाची स्थापना

## एलसीबीचे पीआय म्हणून काम केलेले संतोष साबळे करणार तपास

**बीड । प्रतिनिधी**

**परळी येथील व्यावसायिक महादेव मुंडे यांच्या हत्या प्रकरणी जिल्हा पोलिस अधीक्षक नवनीत काँवत यांनी आक्रमक भुमिका घेत या हत्येच्या तपासासाठी एका तपास पथकाची स्थापना केली आहे.**

महादेव मुंडे यांचा खून करून मृतदेह तहसील कार्यालयाच्या आवारात टाकण्यात आला होता. या घटनेला आता १६ महिने उलटले, तरीही तपास लागलेला नाही. हत्येला १६ महिने उलटूनही आरोपी मोकाट फिरत आहेत. या प्रकरणी त्यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे या आक्रमक झाल्या असून न्यायासाठी आता किती दिवस वाट बघायची?, असा संतप्त सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. त्यांनी आरोपींना पकडण्यासाठी पोलिसांना १० दिवसांची मुदत दिली आहे, अन्यथा पोलिस अधीक्षक कार्यालयासमोर उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. ज्ञानेश्वरी मुंडे यांनी मंगळवारी आपल्या मुलांसह पोलिस अधीक्षक कार्यालयात धाव घेतली होती. त्यांनीपोलिस अधीक्षक नवनीत काँवत कार्यालयात नसल्याने तेथेच ठिय्या मांडला होता. पुढील १० दिवसांत या गुन्ह्याचा तपास झाला नाही, तर थेट पोलिस अधीक्षक कार्यालयातच उपोषण करण्याचा इशाराही त्यांनी दिला होता. त्या पार्श्वभुमीवर पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी मोठा

पान २ वर

# संजय गांधी, श्रावणबाळ योजनेतील निराधारांचे अनुदान तात्काळ वितरीत करा

## आ.संदीप क्षीरसागरांचे तहसिलदारांना निर्देश

**बीड । प्रतिनिधी**

**संजय गांधी, श्रावणबाळ, इंदिरा गांधी या व अशा प्रकारच्या सामाजिक अर्थसहाय्य योजनांचे अनुदान तात्काळ वितरीत करण्याचे निर्देश आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड व शिरूर कासार तहसिलदार यांना दिले आहेत.**

बीड विधानसभा मतदारसंघातील बीड शहर, बीड ग्रामीण व शिरूर कासार



तालुक्यातील लाभार्थ्यांना गेल्या अनेक दिवसांपासून संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्ती वेतन योजना या सामाजिक अर्थसहाय्य योजनांचे अनुदान मिळालेले नाही. या योजनेचे लाभार्थी म्हणजे गरजू, निराधार आणि दुर्बल असतात. त्यांचे जीवनमान

पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१३ फेब्रुवारी २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
| --- | --- | --- | --- |
| गहू: १०.५० क्विंटल | २,४०० | ३,१०० | २,७५९ |
| ज्वारी/हायब्रिड : २१.५० क्विंटल | १,८५१ | २,८५२ | २,२३० |
| मका/लोकल:५.०० क्विंटल | २,२०१ | २,२०१ | २,२०१ |
| तूर : ३८.५० क्विंटल | ६,९५० | ७,१७६ | ७,०७७ |
| उडीद : १८.०० क्विंटल | २,६०० | ३,२३६ | २,९२८ |
| बाजरी: २.५० क्विंटल | २,३०० | २,८४० | २,६१६ |
| मुग : ०.५० क्विंटल | ६,८०० | ६,८०० | ६,८०० |
| सोयाबीन: ५२.५० क्विंटल | ३,९०० | ४,००० | ३,९६६ |
| हरभरा: ३१.५० क्विंटल | ५,३५० | ५,६०० | ५,५२० |

# जलयुक्त शिवार अभियानातून महाराष्ट्र जलक्रांतीच्या दिशेने–मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्यात जलसंधारण विभागाच्या माध्यमातून राबविण्यात येत असलेले जलयुक्त शिवार अभियान हे महत्वाकांक्षी अभियान असून, या अभियानाच्या माध्यमातून राज्यात लोकसहभागातून झालेली कामे ही जलक्रांतीच्या दिशेने पडलेले पाऊल आहे,**



**असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.**

मृद व जलसंधारण विभाग अंतर्गत आयोजित जलसंधारण अधिकारी गट ब (अराजपत्रित) नियुक्ती पत्राचे (रिमोटद्वारे ऑन लाईन पदध्दतीने ) वितरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे हस्ते करण्यात आले. तर प्रातिनिधीक

पान २ वर

# नेता म्हणून कामाने ओळख व्हावी – पंकजा मुंडे



**नागपूर । प्रतिनिधी**

**कोणत्याही नेत्याला हा ओबीसींचा, मराठ्यांचा असे लोबल लावले जाऊ नये. नेता हा सर्वच समाजाचा असतो. फक्त एखाद्या जातीत जन्म घेतला म्हणून त्या समाजाच्या नावाने त्याला ओळखले जाऊ नये. आम्हाला अशी ओळख नको आहे. त्यापेक्षा चांगल्या कामाने जी ओळख निर्माण होते त्या नावाने आपल्याला ओळखल्यास जास्त आवडेल, असे मत पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी व्यक्त केले.**

पंकजा मुंडे यांनी गुरुवारी नागपुरात पत्रकरांशी संवाद साधला. छगन भुजबळ यांची भाजपशी जवळिक वाढत असल्याबाबत विचारणा केली असता त्या म्हणाल्या, भूजबळ हे आमच्या मित्र पक्षात आहेत. महायुतीत आहेत. त्यामुळे जवळीकता आहे. राष्ट्रवादी आम्ही एकत्र आहोत. आम्ही विरोधी पक्षात नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. बुटीबोरी संदर्भात सुद्धा प्रदूषणाच्या तक्रारी आहेत, त्यावर देखील चर्चा करणार आहोत. प्रदूषण खात्याचे काम प्रदूषण दाखवण्याचे आहे.

पान २ वर


# महिला व बालविकास विभागात १८ हजार ८८२ पदांची भरती

## एकात्मिक बालविकास सेवा योजनेअंतर्गत भरतीला होणार सुरुवात

**मुंबई । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र शासनाने ७० हजार पदांची भरती करण्याचा निर्णय घेतला असून महिला व बालविकास विभागांतर्गत एकात्मिक बालविकास सेवा योजनेअंतर्गत ५६३९ अंगणवाडी सेविका व १३२४३ अंगणवाडी मदतनीस अशा एकूण १८ हजार ८८२ पदांची भरती करण्यात येणार असल्याची माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली.**

महिला व बालविकास विभागातील विविध रिक्त पदांची भरती करण्याबाबत आदिती तटकरे यांनी मंत्रालयातील दालनात बैठक घेतली.१४ फेब्रुवारी ते २ मार्च दरम्यान मुख्य सेविका पदासाठी सरळ सेवेच्या माध्यमातून भरती प्रक्रिया राबवण्यात येत असून, ही प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने राबवण्याबाबत उचित खबरदारी घेण्याचे निर्देश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. यासोबतच राज्य महिला आयोग, महिला आर्थिक विकास महामंडळ, बालकल्याण समिती, बाल न्याय मंडळातील रिक्त पदांचीही भरती प्रक्रिया लवकरात लवकर सुरू करावी, अशा सूचना अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. यावेळी



महिला आणि बालविकास विभागाचे सचिव डॉ. अनुप कुमार यादव, एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे आयुक्त कैलास पगारे यांच्यासह इतर अधिकारी उपस्थित होते.

### इच्छुक आणि पात्र उमेदवारांसाठी मोठी संधी

महिला व बालविकास विभागात विविध पदांसाठी मोठ्या प्रमाणावर भरती प्रक्रिया राबवली जाणार आहे. इच्छुक आणि पात्र उमेदवारांसाठी ही एक मोठी संधी आहे. कारण १८८८२ पदांची भरती या महिला आणि बालविकास विभागात होणार आहे. अद्याप विभागाने याबाबतच्या कोणत्याही तारखा निश्चित केल्या नाहीत. यासंदर्भातील भरती प्रक्रियेचे संपूर्ण वेळापत्रक लवकरच जाहीर होण्याचे सागंण्यात येत आहे. महिला व बालविकास विभागाच्या या निर्णयामुळं महिला उमेदवारांना मोठा दिलासा मिळाल्याचे बोलले जात आहे.

## अग्रलेख

# सत्कारावरून राजकिय धूळवड

यंदाचे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन नवी दिल्लीत २१ फेब्रुवारी ते २३ फेब्रुवारी असे तीन दिवस होणार आहे. या संमेलनाच्या अध्यक्षा लोकसाहित्याच्या अभ्यासिका डॉ. तारा भवाळकर आहेत तर स्वागताध्यक्ष ज्येष्ठ नेते शरद पवार आहेत. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा केंद्र सरकारकडून मिळाला आहे, त्यामुळे संमेलनात आनंदाचे वातावरण आहे. शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनाही समक्ष भेटून संमेलनाचे निमंत्रण दिले आहे. संमेलनात विविध कार्यक्रम होणार आहेतच पण या संमेलनाच्या पार्श्वभूमीवर सोमवारी महाराष्ट्र सदनात महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना 'महादजी शिंदे राष्ट्रगौरव' पुरस्कार शरद पवार यांच्या हस्ते व ज्योतिरादित्य सिंधिया, मुरलीधर मोहोळ, शिल्पकार राम सुतार आदी मान्यवरांच्या उपस्थितीत देण्यात आला. मराठी संस्कृतीच्या दृष्टीने तो योग्य होता पण या सत्कारावरुन आता महाराष्ट्रात विरोधी महाआघाडीत जुंपली आहे. शरद पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस आणि उद्धव ठाकरे यांची शिवसेना धुळवडीच्या मुडमध्ये दिसते आहे. इंडीया आघाडीची वाट ज्या दिशेने सुरु आहे तीच दिशा आता महाराष्ट्रात दिसते आहे.

अलीकडे अखिल भारतीय साहित्य संमेलने वेगवेगळ्या वादांनी रंगलेली दिसतात. निवडणूक, वेगवेगळे गट, चिखलफेक आणि राजकारण यामुळे अनेक साहित्यिक संमेलनाच्या अध्यक्षपदाकडे ढुंकूनही पहात नाहीत पण लोकशाही म्हटले की निवडणूक आलीच आणि या निमित्ताने सारे जण वेगळाच खेळ खेळतात व वाद उठवून टीकाटिपणी करत राहतात. यंदा असे वादळ उठले नव्हते. त्यामुळे साहित्य क्षेत्रात कुजबुज सुरु होती पण ती वादळापूर्वीची म्हणावी लागेल. एकनाथ शिंदेंना शरद पवार यांच्या हस्ते महादजी शिंदे राष्ट्रगौरव पुरस्कार देण्यात आला आणि राजकारणी मंडळी चिखलफेकीसाठी सरसावली. आता यात साहित्यिक कशा उड्या मारतात, वात्रटिका करतात आणि बोरू झिजवतात हे पुढे पहावे लागेल. पण संमेलनाला जान आली आहे, संमेलनाला पंतप्रधान हजेरी लावणार असे दिसते आहे. त्यामुळे त्यांचे स्वागत डावे, उजवे कसे करतात हे पण बघावे लागेल. यंदाचे संमेलनही आपली वाद आणि धुळवड परंपरा पाळणार असे दिसते आहे. महाराष्ट्र सदनात झालेल्या पुरस्कार प्रदान सोहळ्यात ज्योतिरादित्य सिंधिया यांनी मराठीतून भाषण केले. उच्चार व शब्द यांच्या मर्यादा लक्षात घेऊनही त्यांचे या सोहळ्यातील भाषण मराठी माणसांना आत्मभान देणारे होते असे म्हणावे लागेल. अटक ते कटक मराठा राज्य, त्यागाची, बलीदानाची, शौर्याची परंपरा, इतिहास आणि छत्रपती शिवाजी महाराज यांचे हिंदवी स्वराज्य, 'बचेंगे तो और भी लढेंगे' बाणा आणि 'दिल्लीचे तख्त राखतो महाराष्ट्र माझा' असे संदर्भ देत गावोगावी मराठा संमेलने झाली पाहिजेत व आपली परंपरा, बांधिलकी रुजवली पाहिजे असे सांगताना आपण सिंधिया नाही शिंदे आहोत असे ते म्हणाले व एकनाथ शिंदे यांना लढवय्या म्हणत त्यांनी गौरवले. शरद पवार यांनीही एकनाथ शिंदे यांची स्तुती केली. त्यांच्या कामाचा गौरव केला. शिंदेचा जावई शिंदेचा सत्कार करतोय यावर बोट ठेवत शिंदेची कारकीर्द उत्तम होती असे प्रमाणपत्र त्यांनी दिले. मात्र या स्तुतीचा, गौरवाचा महाआघाडीत भडका उडला. मिंधेचे कौतुक आणि तेही शरद पवार यांच्याकडून. त्यामुळे शिवसेना ठाकरे गटाचे प्रवक्ते संजय राऊत खवळले. त्यांच्यावर पवारांचा माणूस असा शिक्का असला तरी त्यांनी आपली तोफ पवारांच्या दिशेने वळवली आणि महाराष्ट्र द्रोही, गद्दार, शिवसेना फोडणाऱ्या आणि शहाला मिळून बाळासाहेब ठाकरेंच्या सेनेत फूट पाडणाऱ्यांचा सत्कार कसा करता असे सवाल केले. संमेलन, आरएसएस यांच्यावरही त्यांनी जीभ चालवली व 'आम्हालाही राजकारण कळतं बरं पवार साहेब' असा इशारा दिला. उद्धव ठाकरे यांनीही तीच रि ओढली आणि संमेलनात आणि राजकारणात वादाची ठिणगी पडली. राऊत यांच्या टीकेचा धुरळा खाली बसायच्या आत अमोल कोल्हे यांनी प्रतिहल्ला केला आहे आणि शिंदेंची शिवसेनाही राऊत यांच्या टीकेनंतर गप्प राहिलेली नाही. संजय राऊत केवळ शरद पवारांना लक्ष करुन थांबलेले नाहीत. त्यांनी संमेलनावर बहिष्कार घालणार असा मनोदय व्यक्त केला आहे. आपल्याला पण संमेलनाचे निमंत्रण आहे पण जाणार नाही. हे कसले संमेलन असे म्हणत त्यांनी संमेलन संयोजकावरही राग आळवला आहे, महाविकास आघाडीबद्दलही राऊत बोलले आहेत. दिल्लीत आप आणि काँग्रेस यांचा दारुण पराभव आणि इंडिया आघाडीत असलेले मतभेद याला या सत्कार सोहळ्याने व ठाकरी टीकेने तडका बसला आहे. महाविकास आघाडीत वादाची ठिणगी पडली आहे. शरद पवार काय बोलतात ते बघायचे पण अमोल कोल्हे यांनी 'तूर्राला आरसा दाखवू नका.' राजकारणात सुसंस्कृतपणा हवा, पवार साहेबांनी जे केले ते चुकीचे नाही असे म्हणत आम्ही योग्य आहोत असे दाखवून दिले. आता साहित्य संमेलनात याचे काय व कितपत पडसाद उमटतात बघावे लागेल. डॉ. तारा भवाळकर अध्यक्षीय भाषणात काय बोलतात तसेच महाविकास आघाडीच्या एकतेवर या टीकेचा काय परिणाम होतो हे बघावे लागेल. विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचा दारुण पराभव, केंद्रात, राज्यात सत्ता नाही आणि दिल्लीतही आपचा काँग्रेसचा दारुण पराभव यामुळे विरोधी आघाडीत घालमेल, अस्वस्थता निर्माण झालीच आहे. ती निमित्त शोधून व्यक्त होते आहे. तूर्त संमेलन, सत्कार आणि झोंबलेल्या मिरच्या यामुळे वातावरण वादग्रस्त झाले आहे. नरेंद्र मोदी संमेलनात हजेरी लावलात का? आणि काय बोलतात हे पहावे लागेल, पण संमेलनात वाद ही परंपरा कायम आहे. आणि दिल्ली असो गल्ली असो मराठी माणूस आपला बाणा सोडत नाही हे अधोरेखित झाले आहे.

# उत्पन्न वाढीसाठी दारू दुकाने वाढवायचा धंदा मांडू नका

## ॲड.अजित देशमुख यांचा शासनाला इशारा

बीड । प्रतिनिधी

**अजित पवार यांनी राज्य उत्पादन शुल्क मंत्री पद हाती घेतल्यानंतर पहिल्यांदा त्यांच्याकडे राज्यातील दारूची दुकाने वाढवण्याचा प्रस्ताव सादर झाला. बीड जिल्ह्यात ज्याप्रमाणे खैरात वाटल्यासारखे दारू दुकाने वाटली गेली, तीच परिस्थिती राज्यात करू नका. दारुमुळे हजारो नव्हे तर लाखो कुटुंब उद्ध्वस्त झालेली आहेत. त्याचा विचार करून केवळ उत्पन्न वाढीचे कारण दाखवून सरकारने दारू दुकाने वाढू नयेत. तर भ्रष्ट भ्रष्टाचाराने बरबटलेला कारभार सुधारण्याचा प्रयत्न करावा, असा इशारा जन आंदोलनाचे विश्वस्त ॲड. अजित एम. देशमुख यांनी राज्य उत्पादन शुल्क विभागाला दिला आहे.**

लोकांना दारू पाजण्यासाठी जास्तीत जास्त दारूची दुकाने स्थापन करणे म्हणजे लाखो कुटुंब उद्ध्वस्त करणे आहे. अगोदरच राज्यात आत्महत्यांचे प्रमाण वाढले असून याला देखील शासनाचेच काम जबाबदार आहे. आता आणखी दुकाने वाढली तर एक पिढी बरबाद होईल. या सर्व पार्श्वभूमीवर ॲड. देशमुख यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मुख्य सचिव, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे सचिव आणि संबंधितांना एक तातडीचे निवेदन पाठवले असून समाज विघातक निर्णय घेऊ नये, अशी मागणी केली आहे. राज्य सरकारला उत्पन्न वाढीसाठी जर दारू दुकाने द्यायचे असतील तर ते चुकीचे आहे. राज्यात प्रत्येक खात्यात भ्रष्टाचार वाढला आहे. बीड जिल्ह्यात तर वाढलेल्या भ्रष्टाचाराने थैमान घातले आहे. हे बंद करण्याचा विचार राज्य शासन करत नाही. तर समाज आणखी खड्ड्यात घालण्यासाठी दारू दुकाने वाढवण्याचा विचार केला जात आहे. यातून राज्य शासन आणि प्रशासनातील लोकांना मोठ्या प्रमाणात मलिदा मिळेल. मात्र हा मलिदा पापाचा ठरणार आहे. आणि याचा परिणाम देखील संबंधितांना भोगावा लागेल. राज्य शासनाने दारू दुकाने वाढवण्यासाठी आलेला प्रस्ताव तातडीने फेटाळून लावावा आणि तसेच जनतेसमोर तसे जाहीर करावे. अन्यथा येत्या निवडणुकांमध्ये याचा शासनाला जबर फटका मोजावा लागेल, असेही ॲड. देशमुख यांनी म्हटले आहे.

# परिसंवाद, कथाकथन, कवीसंमेलन बीड ग्रंथोत्सवाचा समारोप

**शिरूर कासार । प्रतिनिधी**

ग्रंथालय संचालनालय, मुंबई आणि जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय बीड यांच्या विद्यमाने बीड ग्रंथोत्सव-२०२४ चा समारोप परिसंवाद, कथाकथन, कवीसंमेलनाने शिरूर कासार येथे दि. १२ रोजी झाला. चिमुकल्यांनी गाजविले कवीसंमेलन उपस्थित श्रोत्यांना मंत्रमुग्ध करत विविध विषयांवरील कवितांच्या सादरीकरणाने कवीसंमेलनात उत्साह संचारला. साहित्यिक डॉ. विठ्ठल जाधव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कवीसंमेलनात बालकविताचे सादरीकरण झाले. अप्पासाहेब तांबे, जगन्नाथ कांबळे, रा.ज. कातखडे, डॉ. नवनाथ पवळे, राजश्री जाधव, द.ल. वारे, भारत पानसंबळ, वर्षा शेळके, आत्माराम झिंजुर्डे, कचरू चांभारे, डॉ. विठ्ठल स. जाधव, आकांक्षा सोनवणे, भार्गवी तुपे, स्वरा जाधव, आरती लाटे, प्रणाली गिर्हे, दीपाली लाटे, प्रसिद्धी गायकवाड यांचेसह मान्यवर कवींनी रचना सादर केल्या. बहारदार सुत्रसंचलन कवी अनंत कराड यांनी केले.

**मराठी भाषेतून रोजगार मिळतो-परिसंवादातील सूर**

पत्रकार उत्तम बोडखे यांच्या अध्यक्षतेत मराठी भाषा, उद्योग, कला आणि रोजगाराच्या संधी या विषयी परिसंवाद झाला. दादासाहेब मुंडे यांनी रोजगार विषयी माहिती दिली. तर डॉ. सोपान सुरवसे म्हणाले की, मराठी भाषेमुळे अनेक ठिकाणी रोजगारांच्या संधी मिळतात. आपण शोधल्या पाहिजेत. आपल्यात अंगभूत कौशल्य असतील तर रोजगाराच्या संधी मिळतात. तर अशोक तांगडे यांनी याविषयी स्वानुभव कथन केले. डॉ. अशोक घोळवे, विष्णू केदार यांनी कलेतून रोजगार मिळतो हे सांगितले. सुत्रसंचलन भास्कर बडे यांनी केले.

**कथाकथनाने भारावले प्रेक्षक**

कथाकार डॉ. भास्कर बडे यांच्या अध्यक्षतेखाली निमंत्रिताचे कथाकथन संपन्न झाले. शेती, शिक्षण, आजचा युवक या विषयावरील कथांमध्ये उपस्थितांनी दाद दिली. पुजा बडे, परशुराम नागरगोजे, ऋतुजा केदार, श्रुती गायकवाड, रूपाली ढास, गायत्री संकडकर यांनी कथा सादर केल्या. उपस्थितांनी दहा ग्रंथविक्री दालनात ग्रंथ खरेदी केली. समारोप प्रसंगी मान्यवरांचा सन्मान केला. जिल्हा ग्रंथालय अधिकारी संजय मस्के , पुरूषोत्तम राऊत, प्राचार्य विश्वास कंधारे सुधीर चाटे अध्यक्ष जिल्हा ग्रंथालय संघ बीड यांच्या उपस्थितीत समारोप समारंभ झाला. सुत्रसंचलन भास्कर मिसाळ यांनी केले. तर प्रभाकर सानप, जिजा खोले, दिलीप वारे, सुधाकर जाधव, पत्रकार दिगांबर गायकवाड, विजयकुमार गाडेकर, गोकूळ पवार, मुख्याध्यापक अंकुश शिंदे यांचेसह नामदेव शिंगटे, अफसर पठाण, भाऊसाहेब शेळके, अशोक ढाकणे, नितीन काकडे, संतोष नेटके यांची उपस्थिती होती.



छत्रपती संभाजी नगर येथील,दैनिक पुढारीचे संपादक धनंजय लांबे यांच्या मातोश्री मीनाक्षीबाई यांचे आजारपणामुळे काही दिवसांपूर्वी निधन झाले.बुधवारी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी त्यांच्या घरी जाऊन धनंजय लांबे व परिवाराची सांत्वन भेट घेतली.

# चाटे स्कूल मध्ये स्नेहसंमेलन उत्साहात

## विद्यार्थी कलाकारांच्या सादरीरणावर प्रेक्षकांनी धरला ठेका

केज । प्रतिनिधी

**शहरातील समर्थनगर भागातील चाटे स्कूल मध्ये मंगळवार रोजी वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न झाले. कार्यक्रमास जेष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा, डॉ नितीन चाटे,शिवाजी ठोंबरे,दिनकर चाटे,भगवान चाटे,रामधन चाटे ,अजय चाटे , राजेभाऊ चाटे , अंनिस चे हनुमंत भोसले, दुर्गादास लांब, डॉ हनुमंत सौदागर, श्रीराम तांदळे,अनिल गलांडे,अर्शद शेख,मुबशीर शेख, दिनकर चाटे, संस्थेचे सचिव शिवाजी चाटे आदींची उपस्थिती होती.**

चाटे इंग्लिश स्कूल येथील चौथ्या



स्नेहसंमेलन कार्यक्रमात चिमुकल्या विद्यार्थ्यांनी मराठी, हिंदी,विविध गीतांवर ठेका धरत प्रेक्षकांची मने जिंकली. सोशल मीडिया च्या अतिवापराचे दुष्परिणाम, अंधश्रद्धा निर्मूलन , पर्यावरण , देशभक्ती आदी विषयावर नाट्य,गीत सादर केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रास्तविक शिवाजी चाटे यांनी केले. हनुमंत भोसले सर यांनी विद्यार्थ्यांना कला, क्रीडा, संगीत या माध्यमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो असे मत व्यक्त केले. व विद्यार्थ्यांची आवड कशात आहे हे पालकांनी व शिक्षकांनी ओळखून विद्यार्थ्यांना योग्य ते मार्गदर्शन करून प्रोत्साहन द्यावे मला खात्री आहे की चाटे स्कुल च्या रोपातून वटवृक्ष उभा राहत आहे.विद्यार्थ्यांनी मोबाईलचा वापर कमी करून मैदानी खेळ खेळावेत असे मत व्यक्त केले. स्नेहसंमेलन कार्यक्रमास पालक ,विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रम यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक यांच्यासह शिक्षकेत्तर कर्मचारी आदींनी परिश्रम घेतले.


# सुरत-चेन्नई महामार्गाच्या भुसंपादनाचा मार्ग मोकळा; दोन दिवसात उठणार स्थगिती

## खा.बजरंग सोनवणेंनी घेतली केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची भेट

बीड । प्रतिनिधी

केंद्र सरकारची भारतमाला परियोजना या महत्वाकांक्षी योजनेच्या पहिल्या टप्प्यामधे सुरत-चेन्नई महामार्ग जात आहे. हा राष्ट्रीय महामार्ग बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातून प्रस्तावित आहे. या महामार्गासाठी सर्वेक्षणाचा काम पुर्ण झालेले असून भुसंपादनाच्या कामास केंद्र सरकारने स्थगिती दिलेली आहे. सदरील स्थगिती उठवावी, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेत केली. यावेळी दोन दिवसात ही स्थगिती उठवू, असे आश्वासन मंत्री नितीन गडकरी यांनी दिले आहे.

खा.बजरंग सोनवणे यांनी जिल्ह्याच्या विकासाला गती देण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. दि.१३ फेब्रुवारी रोजी नवी दिल्ली येथील संसद कार्यालयामधे केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेत सुरत-चेन्नई महामार्गाचा विषय मांडला. यावेळी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, प्रस्तावित सुरत-चेन्नई महामार्ग प्रकल्पासाठी भूसंपादन वेळेवर सुरू करणे महत्वाचे आहे. हा महामार्ग जिल्ह्यातील विविध भागातून जात असल्याने येथील विकासाला चालना मिळेल. प्रस्तावित महामार्ग बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील नांदूर, बाळेवाडी, कुंभेफळ, खुंटेफळ पुंडी, चिंचोली पुंडी, टाकळी अमिया, रूई नालकोल, नांदा, निमयगाव चोभा, धिर्डी, केळसांगवी, शिराळ, इमनगाव, खानापूर, चिखली, वाळूज, पारगाव, जोगेश्वरीतून पुढे जामखेड या गावातून जातो आणि जिल्ह्यातील प्रमुख महामार्गांपैकी एक असणार आहे. या प्रकल्पाचे कनेक्टिव्हिटी सुधारण्यासाठी, प्रवासाचा वेळ कमी करण्यासाठी आणि कॉरिडॉरवरील आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी खूप महत्त्व आहे. या महामार्गाचे सर्वेक्षण झालेले आहे. परंतु २३ नोव्हेंबर



२०२३ रोजी भुसंपादनाच्या कामाला स्थगिती देण्यात आलेली होती. सदरील पत्रात अतिरिक्त दायित्वे निर्माण करण्यापूर्वी भारतमाला परियोजनेचा टप्पा-१ अंतर्गत आवश्यक मंजुरी मिळवण्याचे महत्त्व अधोरेखित केले आहे. बीड जिल्ह्यात लवकरात लवकर भूसंपादन सुरू करणे आवश्यक आहे. प्रस्तावित सुरत-चेन्नई महामार्ग हा एक महत्त्वाचा पायाभूत सुविधा प्रकल्प आहे. जो बाजारपेठेपर्यंत पोहोचण्यात सुधारणा करून, रोजगाराच्या संधी निर्माण करून आणि प्रादेशिक विकास वाढवून मोठ्या लोकसंख्येला फायदा देईल. भूसंपादन प्रक्रियेच्या मंजुरीसाठी आणि त्यानंतरच्या सुरुवातीसाठी आवश्यक पावले उचलण्यात यावीत, असे म्हटले आहे. यावेळी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी खासदारांच्या आग्रही मागणीला सकारात्मक प्रतिसाद देऊन दोन दिवसात भुसंपादन प्रक्रिया चालू करण्यात येईल, असे आश्वासन दिले. खा.बजरंग सोनवणे हे रेल्वे सोबतच जिल्ह्यातील महामार्गाच्या कामांना गती मिळावी, यासाठी प्रयत्न करत आहेत.

## पान १वरून...

### शेतकऱ्यांना सरकारी

सरकार डिसेंबरपासून आठवड्याला १.५ लाख टन प्रक्रियादारांना विकत होते. मात्र तरीही गव्हाचे भाव कमी होत नव्हते. परिणामी सरकारने ई लिलावातून गहू विक्रीचे प्रमाण वाढवले. नुकत्याच पार पडलेल्या लिलावात सरकारने ४ लाख टन गहू विकला. त्यामुळे गव्हाचे भाव काहीसे कमी झाले. सरकारने यंदा गव्हाला २ हजार ४२५ रुपये हमीभाव जाहीर केला. तर गव्हाचा सरासरी बाजारभाव २ हजार ९५० रुपयांच्या दरम्यान आहेत. गव्हाचा भाव क्विंटलमागे कमी झाला. मात्र तरीही गव्हाचा भाव हमीभावापेक्षा खूपच जास्त आहे. सरकारला गव्हाचा भाव हमीभावाच्या दरम्यान आणायचा आहे. त्याशिवाय सरकारला गहू खरेदी करता येणार नाही. त्यामुळे सरकार यापुढच्या लिलावातही आठवड्याला ४ लाख टन गहू विकणार आहे.

---------------

### सोलापूर-संभाजीनगर, येडशी-जालना

होती. यावेळी मंत्री वैष्णव यांनीही सकारात्मकतेने या मार्गाचा प्रश्न मार्गी लावू, असे आश्वासन दिले होते. यानंतर दि.१३ रोजी खा.सोनवणे यांनी दोन्ही मार्गाची सविस्तर माहिती असलेला अहवाल केंद्रीय मंत्र्यांना दाखविला. याआधी धाराशिव-बीड-छत्रपती संभाजीनगर रेल्वे लाईनचे सर्व्हेक्षण झालेले आहे. दरम्यान, येडशी-जालना या रेल्वे मार्गाचेही सर्व्हेक्षण करून दोन्ही पैकी जो सुलभ मार्ग असेल तो विचारात घेवू, असे मंत्री वैष्णव यांनी म्हटले. भेटीदरम्यान, रेल्वेअधिकाऱ्यांना बोलावून तातडीने दोन्ही रेल्वे मार्गाचे सर्व्हेक्षण करण्याचे आदेशही दिले. जिल्ह्यात राजकिय धुळवड सुरू असताना खा.बजरंग सोनवणे हे जिल्ह्याच्या विकासासाठी पायाला भिंगरी लावून काम करताना दिसत आहेत.

-------------

### अखेर मणिपूरमध्ये राष्ट्रपती

या घटनेमुळे देशभर संताप व्यक्त करण्यात आला होता. मणिपूरमध्ये मागील मे महिन्यापासून उसळलेल्या हिंसाचारामध्ये १८० पेक्षा अधिक नागरिकांचा मृत्यू झाला असून शेकडो नागरिक बेघर झाले आहेत. हिंसा थांबत नसल्याने अखेर केंद्र सरकारने राज्यात राष्ट्रपती राजवट लागू केली आहे. अजयकुमार भल्ला यांची मणिपूरच्या राज्यपालपदी नियुक्ती करण्यात आलेली होती. तेव्हापासून राज्यात राष्ट्रपती राजवट लागू होईल, अशी शक्यता वर्तवण्यात आलेली होती. शेवटी १३ फेब्रुवारीपासून मणिपूरमध्ये राष्ट्रपती शासन लागू झाली आहे. मणिपूरमध्ये राष्ट्रपती राजवट लागू करण्याचा निर्णय राज्यघटनेच्या कलम ३५६ नुसार घेण्यात आला आहे. एखाद्या राज्यात सरकार चालवण्यात अडचणी येत असतील तर त्या ठिकाणी राष्ट्रपती राजवट लावण्याचा निर्णय घेतला जातो.

-----------

### संजय गांधी, श्रावणबाळ योजनेतील

या अनुदानावर अवलंबून असते. त्यामुळे गेल्या अनेक दिवसांपासून या योजनांचे लाभार्थ्यांना अनुदान मिळाले नसल्याने मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे सदरील योजनेच्या लाभार्थ्यांना त्यांना मिळणाऱ्या अनुदानाची रक्कम तात्काळ वितरीत करा असे निर्देश आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड व शिरूर कासारचे तहसिलदार यांना दिले आहेत.

------------

### महादेव मुंडे हत्या प्रकरणाचा तपास

निर्णय घेतला असून, महादेव मुंडे हत्या प्रकरणाच्या तपासासाठी ५ सदस्यीय पथकाची स्थापना केली आहे. या पथकात एक पोलीस निरीक्षक आणि चार कॉन्स्टेबलचा समावेश असणार आहे. एलसीबीचे पीआय म्हणून काम केलेले संतोष साबळे यांच्यासह चार पोलिस कर्मचारी हे आती या प्रकरणाचा तपास करणार आहेत.

---------------

### काँग्रेस प्रदेशाध्यक्षपदी

जवळचे मानले जातात. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला दारुण पराभवाला सामोरे जावे लागले. या पराभवानंतर नाना पटोले यांनी पक्ष नेतृत्वाकडे पदमुक्त करा, असे गाऱ्हाणे घातले होते. दरम्यान, दोन दिवसांपूर्वी नाना पटोले यांनी राहुल गांधींची भेट घेतली. या भेटीमध्ये प्रदेशाध्यक्षपदी नव्या आणि तरुण चेहऱ्याला संधी द्या, अशी मागणी नाना पटोले यांनी केली होती.

----------------

### नेता म्हणून कामाने ओळख

पण त्यापलीकडे हे खात जावे, नोटीस न देता अंमलबजावणीसाठी काम करता यावे यासाठी या खात्याची पुनर्रचना करण्याचे काम सुरू आहे. अधिवेशनापर्यंत त्याला वेळ लागेल. प्रदूषणाचे वेगवेगळे झोन असतात. त्यावर आम्ही काम करू. तपासणीवर भर देऊ असेही मुंडे यांनी यावेळी स्पष्ट केले.

-------------

### जलयुक्त शिवार अभियानातून महाराष्ट्र

स्वरुपात सहा उमेदवारांना प्रत्यक्ष नियुक्ती आदेशाचे वितरण करण्यात आले. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथील सभागृहात झालेल्या या समारंभास मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, राज्यमंत्री इंद्रनील नाईक, मृद व जलसंधारण विभागाचे सचिव गणेश पाटील, आयुक्त प्रकाश खपले यांच्यासह नवनियुक्त अधिकारी व त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते. जलसंधारण विभागामध्ये निवड झालेल्या या ६०१ अधिकाऱ्यांचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, जलसंधारण विभाग हा शेतकऱ्यांच्या जीवनामध्ये परिवर्तन घडवणारा विभाग आहे. या विभागाच्या परिवारामध्ये नवनियुक्त अधिकाऱ्यांनी सामान्य माणूस व शेतकऱ्यांच्या जीवनात परिवर्तन घडविण्याचे ध्येय बाळगावे. शासनाच्या माध्यमातून सामान्यांची सेवा करण्याची आपणास संधी मिळाली आहे. या संधीचे सोनं करून जनसामान्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलवावे. राज्यात ७५ हजार हजार नोकर भरती करण्यास सुरुवात केली. प्रत्यक्षात १ लाख ५० हजार नोकर भरती होत असल्याचे त्यांनी सांगितले. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्यातील ग्रामीण भागात पाणीटंचाई दूर करून शाश्वत शेतीसाठी पाण्याची उपलब्धता निर्माण करणे हा जलयुक्त शिवार अभियानाचा मुख्य उद्देश आहे. या अभियानाच्या माध्यमातून राज्यातील गावे जलयुक्त झाली असून भूजल पातळीत वाढ झाली आहे. शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी उपलब्ध झाले, ज्यामुळे पीक उत्पादनात वाढ झाली. भूजल पातळीत वाढ झाल्याने शेतकऱ्यांना दोन्ही हंगामात पीक घेता येऊ लागली हे या अभियानाचे यश आहे. जलयुक्त शिवार योजना राज्याच्या जलसंधारणासाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरली. या योजनेच्या कामांमुळे देशात महाराष्ट्रात भूजल पातळी वाढ झाल्याचे केंद्र शासन व उच्च न्यायालयानेही त्यांच्या अहवालात मान्य केले आहे. भविष्यात ही योजना अधिक काटेकोरपणे, नियोजनबद्ध तंत्रज्ञानाधारित आणि स्थानिक सहभाग घेऊन अधिक प्रभावीपणे राबविण्यात येणारे असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. सचिव गणेश पाटील यांनी प्रास्ताविक केले तर आभार आयुक्त प्रकाश खपले यांनी मानले.

-------------

cmyk



## शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्यासह घड्याळाचे वाटप

**माजलगाव । प्रतिनिधी**

मौजे ब्रम्हगाव जिल्हा परिषद शाळेचा माजी विध्यार्थी आदित्य रामेश्वर शेंडगे याच्या वाढदिवसाच्या निमित्ताने अंगणवाडीतील बाल विध्यार्थ्यांना पाटी पेन्सिल व शाळेतील विद्यार्थ्यांना इयत्ता पहिली ते चौथीतील विध्यार्थ्यांना घड्याळ तसेच अंगणवाडी इमारती मध्ये भिंतीवरील घड्याळ व जिल्हा परिषद शाळेत एक भिंतीवरील घड्याळ काँग्रेस नेते दत्ता कांबळे यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. यावेळी वाढदिवसाचा अनावश्यक खर्चाला फाटा देत सामाजिक जाणीवतून नाशिक येथे अभियांत्रिकीचे शिक्षण घेत असलेल्या आदित्य रामेश्वर शेंडगे याच्या संकल्पनेतुन हा उपक्रम राबावण्यात आला. यावेळी राष्ट्रीय काँग्रेस अनु जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांच्या हस्ते सर्व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी काँग्रेस नेते दत्ता कांबळे यांनी आदित्य शेंडगेला वाढदिवसाच्या शुभेच्छा देत, शेंडगे कुटुंबाचे सामाजिक उपक्रमाबद्दल अभिनंदन करत सर्वांनी विध्यार्थ्यांना प्रेरणा आणि प्रोत्साहन मिळावं असे सामाजिक उपक्रम करावेत असे आवाहन केले. यावेळी मुख्याध्यापक मुरलीधर गवळी सर, आदित्यचे आई उर्मिला शेंडगे,वडील माजी सरपंच रामेश्वर शेंडगे यांच्या सह शालेय समिती अध्यक्ष बबिता कांबळे, अंगणवाडी सेविका, कांचन सानप मॅडम, शिल्पा कांबळे मॅडम, नितीन कांबळे सह विध्यार्थी उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांनी नेहमी अव्वलस्थानी राहण्याच्या ध्येयाने काम केले पाहिजे

## संवेदनशील लेखक अरविंद जगताप यांचे प्रतिपादन

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

येथील योगेश्वरी महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन दिनांक ८ ते १० फेब्रुवारी दरम्यान यशस्वीपणे संपन्न झाले. या स्नेहसंमेलनाच्या पारितोषिक वितरण व समारोप समारंभ प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून संवेदनशील लेखक,चला हवा येऊ या खळखळून हसवणाऱ्या कार्यक्रमातील ज्यांच्या संवेदनशील पत्रलेखनाने सर्वांच्या डोळ्यात पाणी आणले असे मराठी चित्रपट पटकथा व संवाद लेखक मा. अरविंद जगताप यांना आमंत्रित करण्यात आले होते. अरविंद जगताप यांनी आपल्या भाषणाद्वारे विद्यार्थ्यांना प्रेरित केले. त्यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांनी नेहमी अव्वलस्थानी राहण्याच्या ध्येयाने काम केले पाहिजे असे प्रतिपादन केले. प्रत्येकाने नेतृत्व करण्याची क्षमता स्वतः मध्ये विकसित केली पाहिजे. विद्यार्थ्यांनी खरकटे होण्यात आपले आयुष्य घालवू नये आणि कोणाचीतरी चमचेगिरी करण्यात धन्यता मानु नहा असा संदेश दिला. त्यांनी चला हवा येवू द्या मधील ''बाप''यावरील पत्र वाचून उपस्थितांना भावूक केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान योगेश्वरी शिक्षण संस्थेचे सचिव मा. कमलाकरराव चौसाळकर यांनी भुषवले. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी योगेश्वरी महाविद्यालयाचे अनेक विद्यार्थी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर उच्च पदावर कार्यरत असल्याचे सांगून महाविद्यालयाच्या यशाची ही परंपरा आपण पुढे चालू ठेवावी व ती वाढवावी असे आवाहन करून सर्व विद्यार्थ्यांनी आणि प्राध्यापकांनी यासाठी अधिकाधिक प्रयत्न करावेत अशा भावना व्यक्त केल्या. याप्रसंगी योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा.चंद्रशेखर बर्दापूरकर, उपाध्यक्ष गणपत व्यास गुरुजी, कार्यकारी उपाध्यक्ष ॲड. जगदीश चौसाळकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. व्हि. कानेटकर, उपप्राचार्य डॉ. आर.व्ही. कुलकर्णी, स्नेहसंमेलन प्रमुख डॉ. अनिल नरसिंगे, आय. क्यू.ए. सी. समन्वयक डॉ.सचिन कळलावे, डॉ. महेंद्र आचार्य, विद्यार्थी प्रतिनिधी कु.ईश्वरी खाडे यांची




उपस्थिती होती. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. व्हि. कानेटकर यांनी आपल्या प्रास्ताविकात महाविद्यालयाने गेल्या वर्षभरात राबविलेल्या विविध उपक्रमांचा अहवाल सादर केला.सूत्रसंचालन कु. श्रेया कोंडपल्ले व अक्षता मुळे या विद्यार्थिनींनी केले. आभार प्रदर्शन स्नेहसंमेलन प्रमुख डॉ. अनिल नरसिंगे यांनी केले. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर आयोजित युवा महोत्सवात शास्त्रीय नृत्य या कलाप्रकारात प्रथम आल्याबद्दल महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. ईश्वरी खाडे या विद्यार्थिनीचा तसेच युवा महोत्सवात शॉर्ट टेलिफिल्म मध्ये तृतीय क्रमांक मिळाल्याबद्दल यश केंद्रे, निखिल यादव, ईश्वरी खाडे, दीपक उखंडे, निखिल जाधव या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी गुणवंत विद्यार्थ्यांना व स्नेहसंमेलनानिमित्त आयोजित विविध स्पर्धांमधील विजेत्या स्पर्धकांना पारितोषिके देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. या वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त महाविद्यालयात विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी क्रिकेट, बॅडमिंटन, टेबल टेनिस, बुद्धिबळ, १०० मीटर धावणे, गोळाफेक या क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. या क्रीडा स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. तसेच वक्तृत्व, निबंध, रांगोळी, चित्रकला, पोस्टर्स स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. विविध डेज, ट्रॅडिशनल डे, विविध सांस्कृतिक कार्यक्रम व स्पर्धा, फिश पॉन्ड याचेही आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या डेज निमित्त विविध वेशभूषा परिधान करून उपस्थितांचे मनोरंजन केले. तसेच यानिमित्त आनंद नगरीचेही आयोजन करण्यात आले होते. यामध्येही विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या खाद्य पदार्थांचे स्टॉल लावले. सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी कविता, शेरो शायरी, एकपात्री नाटक, भारुड, गायन व नृत्य यांचे उत्कृष्टपणे सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली.या स्नेहसंमेलनात एकूण ५०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी जल्लोषात सहभाग नोंदविला. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ.सचिन कळलावे, डॉ. राजेश जोशी, डॉ. महेंद्र आचार्य,डॉ. जी. डी. सूर्यवंशी, प्रा. जीवन कोंडरे, डॉ. संतोषकुमार सुर्वे, डॉ. प्रदीप लासोनकर, डॉ. संदीप काळे, डॉ. एस.डी. घन, डॉ. एस. सी. जाधवर, डॉ. सारिका संगेकर, डॉ. सारिका जगताप, सुशील कुलकर्णी, नंदकुमार बलुतकर, मनू कोरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## माजी मुख्याध्यापिका श्रीमती विजयाताई क्षीरसागर यांची ग्रंथतुला ; पुस्तक प्रकाशन सोहळा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**येथील जिल्हा परिषद शाळेच्या निवृत्त मुख्याध्यापिका श्रीमती विजयाताई सुधाकर क्षीरसागर यांच्या तीन लेकींनं प्रकाशित केलेल्या कविता संग्रहाच्या माध्यमातून समर्पित भाव ज्याला नात्याच्या रेशमी धाग्याने गुंफताना मातृत्वाची ग्रंथ तुला करून समाजात आदर्श प्रस्थापित केला. ते खर्या अर्थाने कौतुकास्पद म्हणावे लागेल. मराठी भाषेला अभिजात दर्जा प्राप्त झाल्याने तिच्याकडे बघण्याचा वेगळा आयाम तयार झाल. कविता ताजी असेल तरच वाचकांना आवडते. त्या दृष्टीने कवी मनाने विचार करायला हवा. कवितेच्या रचनेतून सामाजिक मन आणि जबाबदारीची जाणिव करून देता येते असे प्रतिपादन नागपूर येथील प्रसिद्ध लेखिका विजया मारोतकर यांनी केले.**

सौ.अपर्णा कुलकर्णी, आश्विनी निवर्गी आणि प्रा.डॉ.सीमा पांडे या भगिनींनी स्वयंरचित केलेल्या कविता संग्रहाच्या पुस्तकाचे प्रकाशन सौभाग्य मंगल कार्यालयात नुकतेच संपन्न झाले. विशेष म्हणजे त्याच ग्रंथ पुस्तिकांनी त्यांच्या आईची ग्रंथ तुला करण्यात आली. व्यासपीठावर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.सुरेश खुरसाळे, जेष्ठ साहित्यिक माजी प्राचार्य वेदकुमार वेदालंकार, सुनिता देशमुख यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक करताना प्रा.सीमा पांडे यांनी या उपक्रमामागची पुर्वपिठीका सांगून मातृसंस्थेविषयी असलेले दायित्व लेकी म्हणून तो जोपासण्याचा आम्ही छोटासा प्रयत्न केल्याचे त्यांनी सांगितले. याच कार्यक्रमात अश्विनी



### लेकीनं आईसाठी पुढाकार घेणं कौतुकास्पद -लेखिका विजया मारोतकर

निवर्गी लिखित वनोद्वारी, सेवाव्रती मेजर या पुस्तकाचे ही प्रकाशन करून प्रा.एस.पी.कुलकर्णी यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. ८५ वर्षांच्या विजयाताई क्षीरसागर यांना त्यांच्या लेकीनं केलेल्या कौतुकाचा आनंदाने स्विकार करताना डोळ्यांतले आश्रु रोखता आले नाहीत. याचि देहि, याचि डोळा लेकरं, लेकी लेखक झाल्या, त्यांनीच संपादित ग्रंथ संपदा ज्या तराजूत मला तोलल्या गेलं यापेक्षा आयुष्यातला आनंद दुसरा असु शकत नाही. पण, याप्रसंगी स्व.प्रा.सुधाकरराव (पती) नसल्याची खंत त्यांना जाणवली. सौ.अपर्णा कुलकर्णी यांनी तर नात्याचे रेशमी बंध यावर आधारित स्वत:च्या जीवनात माहेरी आणि सासरी आलेल्या प्रत्येक नातेवाईकांच्या भुमिकेचं कवितेच्या माध्यमातून रेखाटन केलं. ज्याचं नांव नात्याचे रेशमी बंध असं दिलं. अर्थात मातृ संस्थेची आदर्श महती सांगणारी कविता संग्रह इथे प्रकाशित झाल्याने उपस्थितांनी कौतुक केले. प्रा.गणेश पिंगळे, अश्विनी निवर्गी यांनी मनोगत व्यक्त केले. तर सुनिता देशमुख यांनी आईचे महत्व जीवनात किती आहे हे पटवून दिले. ज्ञानेश्वरी ग्रंथाचा हिंदीतून अनुवाद करणारे वेदालंकार ज्यांचं वय ९४ वर्षे आहे त्यांच्याही साहित्याचा सन्मान कुटुंबियांच्या वतीने करण्यात आला. अध्यक्षीय समारोप करताना डॉ.खुरसाळे यांनी या सर्व कुटुंबियांचं कौतुक करून आईच्या ऋणानुबंधाप्रती लेखणीच्या माध्यमातुन सामाजिक बांधिलकी जोपासत नविन आदर्श प्रस्थापित केल्याबद्दल उपक्रमाचेही कौतुक केले. या सोहळ्यासाठी मोठ्या प्रमाणावर महिलांची तथा विविध क्षेत्रातील मान्यवरांचीही उपस्थिती होती. वर्तमान समाजव्यवस्थेत जन्मदात्याकडून आई - वडिलांची परवड होते. एव्हाना जबाबदारी आणि कर्तव्याची जाणिव जन्म दिलेल्या लेकरांनाही नसते असे अनेक उदाहरणं समोर येत असताना लेकी जेव्हा आईचा स्वलिखित ग्रंथ संपदेने सन्मान करतात यापेक्षा आनंद दुसरा कोणताच नाही हे तितकंच खरं. या अनोख्या सोहळ्याचं शहरात सर्वत्र कौतुक होत आहे.

पान ६ वरून...

### सांगली जिल्ह्यातील ४

लैंगिक अत्याचार करुन तिचा खून केला.दारू पिलेला हा नराधम त्या चिमुकलीला लपवण्यासाठी तेथील एका लोखंडी पेटीचा आधार घेत तिचा मृतदेह त्या पेटीत टाकला.दुसरीकडे नात हरवली म्हणून आज्जी सर्वत्र मुलीचा शोध घेत होती. सर्वत्र शोधाशोध सुरु होती.पोलिसांना पाचारण करण्यात आले होते.काही अंतरावर हा ''क्रूरकर्मा'' दारू पिऊन तर्रर होता. पोलिसांनी त्याला ''खाक्या'' दाखवताच त्याने गुन्हा कबूल केला.नातीचा मृतदेह पाहताच आज्जीने हंबरडा फोडला. ४ वर्षीय मुलीची हत्या झाल्याचे कळताच संपूर्ण जत शहर सुन्न झाले होते. सर्वांची पायाखालची ''वाळू'' जणू घसरली होती. दुर्दैवी आज्जीचे रडणे आणि आक्रोश जत च्या माणुसकीच्या अभेद्य भिंती भेदत न्यायाची भीक मागत होत्या. क्रूर नरधमाला फाशीची शिक्षा होण्यासाठी,आता सांगली जिल्हा एकवटला असून ''जत बंद'' चे नियोजन केले आहे.४ वर्षीय चिमुकली परत येणार नाही पण संवेदना हरवलेल्या या जगात प्राणाची किंमत ''शून्य'' आहे, याची जाणीव अंगाला ''शहारे'' देणारी ठरत आहे. या आरोपीला फाशी होण्यासाठी फास्टट्रॅक कोर्टात केस चालवावी. अरब देशात बलात्कार / खून प्रकरणात आरोपीला दोन दिवसात तात्काळ ''फाशीची'' शिक्षा देण्यात यावी जत मध्ये घटना घडली असून अशी घटना कोणत्या गावात किंवा जिल्हात घडणार नाही याची काळजी घेऊन आरोपीला तात्काळ केस फास्टट्रॅक कोर्टात चालवुन आरोपीला तात्काळ फाशी देण्यात यावी अशी मागणी मुस्लिम समाजाच्या वतीने तहसीलदार यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.यावेळी शेख रशिद,शौकत शेख, मुश्ताक कुरैशी,नसीर पठाण,जानुशहा शेख यांची उपस्थिती होते.

### देवडी येथे बांधकाम

नारायणी बाल रूग्णालया,बीड ,५) शिवाजीराव बडे हॉस्पिटल बीड, इत्यादी दावखाण्यात आता बांधकाम कामगाराचा मोफत वैद्यकीय उपचार होणार तरी सर्व बांधकाम कामगारांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन कॉ.ओम पुरी यांनी केले व या शिबीरात बांधकाम कामगारांची आरोग्य तपासणी डॉ.मनिषा माहाजन डॉ.गोविंद उदवंत यांनी केली व त्यांचे सहकारी कु.रोहिणी चिंचकर,श्री.शरद पेरके,कु.निशा बडे,श्री.सौरभ ढोले अभिषेक थिटे व एकनाथ जाधव यांनी केली.

या तपासणी नंतर बांधकाम कामगारांना आरोग्य कार्ड '' '' व औषधात (मेडिकल) चे वाटप देवडी चे संरपच श्री.अतुल झाटे, ग्रामपंचायत अधिकारी श्री.अविनाश राठोड व कॉ.ओम पुरी यांच्या हास्ते करण्यात आले.या शिबीरात देवडी येथील बांधकाम कामगारची व त्यांच्या कुटुंबातील सदस्याची उपस्थित मोठ्या प्रमाणात होती .

### आरोग्य विभागाच्या रुग्णवाहिकांनी

प्रकारानंतर रुग्णांच्या नातेवाईकांनी दिनांक १२.२.२०२५ रोजी रुग्णवाहिकेची तक्रार वैद्यकीय अधीक्षक उपजिल्हा रुग्णालय केज यांच्याकडे करण्यात आली त्याची चौकशी सुरू आहे.

या प्रकारामुळे बीड जिल्यातील १०८ रुग्णवाहिकांची चौकशी करून माहिती घेतली असता धक्कादायक प्रकार समोर आले आहेत जिल्यातील १०८ रुग्णवाहिका ह्या शोभेच्या वस्तू बनल्या आहेत त्यांच्यावर काम करणारे डॉक्टर हे गैरहजर राहतात व फक्त ड्रायव्हर रुग्णांना घेऊन जातात असे प्रकार उघडकीस आल्याचे समजते. त्या प्रकरणात तक्रार करण्यात आली होती अशी माहिती आहे. तसेच रुग्ण वाहिका या उभ्या असताना ऑन कॉल कशा दाखवल्या जातात ही धक्कादायक गोष्ट समोर आली आहे त्यांना लागू असलेली प्रणाली चालू आहेत की बंद आहेत याची तपासणी कोण करते हे अनुत्तरित आहे . तसेच शासकीय रुग्णालयातून पुढील उपचारासाठी जाणार रुग्ण हा शासकीय रुग्णवाहिकेतून जातो की खाजगी रुग्णवाहिकेतून जातो हे पण तपासणी करण्याची गरज आहे ही ही जबाबदारी कोणाची आहे? १०८ रुग्णवाहिकेसोबत डॉक्टर व स्टाफआहे की नाही हे पाहण्याची जबाबदारी कोणाची आहे? शासकीय रुग्णालयातून पुढील उपचारासाठी जाणारे रुग्ण खाजगी रुग्णवाहिकेने पाठवावे की शासकीय रुग्णवाहिका द्यावी ही जबाबदारी कोणाची आहे ? तसेच प्रत्येक रुग्णालयातून १०८ रुग्णवाहिकेने किती रुग्ण उपचारासाठी घेऊन जाण्यात आले त्यांची बिले अदा करण्यासाठी कोणाच्या साह्य असतात ते यांच्यावर नियंत्रण करू शकत नाहीत का? या सर्व बाबीची चौकशी होऊन रुग्णांना तात्काळ आरोग्य सेवा देण्यात याव्यात व संबंधीत यंत्रणेतील सर्व दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कार्यवाही करावी अशी मागणी भाजपा वैद्यकीय आघाडीचे जिल्हाप्रमुख डॉ वासुदेव नेहरकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आरोग्यमंत्री,पालकमंत्री अजीतदादा पवार,संपर्कमंत्री पंकजाताई मुंडे बीड,आ नमिताताई मुंदडा व आरोग्य उपसंचालक लातूर यांच्याकडे केली आहे.

### कॉपीमुक्त वातावरणात वडवणी

विद्यालय चिंचाळा याठिकाणी ३८२, मंकावती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय चिंचवण याठिकाणी ४५३ अशाप्रकारे एकूण ८ परिक्षा केंद्रावर ३ हजार १९६ विद्यार्थी बारावी बोर्डाच्या परिक्षेस बसलेले आहेत. वरिल सर्व परिक्षा केंद्रांवर कॉपीमुक्त अभियानाची प्रकर्षाने अंमलबजावणी व्हावी याकरिता नियंत्रणासाठी ८ बैठे पथकांची नियुक्ती करण्यात आलेली असून सर्व परिक्षा केंद्रांवर इतर ठिकाणचे कर्मचारी यांची नियुक्ती केलेली असल्याने व बैठे पथकांची देखील प्रत्येक पेपरला वेगवेगळी नियुक्ती केलेली असल्याने सर्व ठिकाणी परिक्षा या कॉपीमुक्त वातावरणामध्ये सुरळीतपणे सुरु आहेत. शिक्षण विभागाबरोबरच पोलीस प्रशासन देखील यासाठी अथक परिश्रम घेत आहे. विद्यार्थी, शिक्षक, किंवा अन्य कोणीही जर परिक्षांच्या बाबतीत घालून दिलेल्या नियमांचे उल्लंघन केल्यास त्यांच्यावर शासन निर्देशाप्रमाणे कठोरात कठोर कारवाई करण्यात येईल असा सज्जड इशाराही वडवणी तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी तथा परिरक्षक केंद्राचे प्रमुख बाबासाहेब उजगरे यांनी आपली प्रतिक्रिया व्यक्त करतांना दिला आहे.

## आष्टीत छत्रपती शिवाजी महाराज जयंतीच्या शुभमुहूर्तावर स्वराज ट्रॅक्टर शोरूमचा उद्घाटन समारंभ होणार

### शेतकऱ्यांसाठी खुशखबर आष्टीकरांच्या सेवेत प्रथमच स्वराज ट्रॅक्टरचे अधिकृत डिलर सावळेश्वर ट्रॅक्टर्स

**आष्टी । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांसाठी दणगट व कमी खर्चात ज्यादा काम करणाऱ्या स्वराज्य ट्रॅक्टर खरेदीवर बंम्फर ऑफर आहे.आष्टीकरांच्या लवकरच सेवेत सावळेश्वर उद्योग समूहाचे मा.रमेश दादा आजबे पाटील यांचे सावळेश्वर ट्रॅक्टरच्या शोरूमचा बुधवार दि १९ फेब्रुवारी रोजी आष्टीत छत्रपती शिवाजी महाराज जयंतीच्या शुभमुहूर्तावर स्वराज ट्रॅक्टर शोरूमचा उद्घाटन समारंभ होणार असून तात्काळ बुकिंग करणाऱ्या ग्राहकांसाठी बंपर ऑफर सवलती देण्यात येत असून ग्राहकांना आकर्षक व्याजदर,आकर्षक किंमत व आकर्षक ऑफर मिळणार असून खास ऑफर मिळवण्यासाठी




तात्काळ सावळेश्वर ट्रॅक्टर शोरूमला अवश्य भेट द्या आणि ट्रॅक्टर बुकींग करुन सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा. ठिकाण धोंडे पेट्रोल पंपासमोर आष्टी सावळेश्वर उद्योग समूहाचे आपल्या आष्टी शहरांमध्ये स्वराज ट्रॅक्टरचे अधिकृत डीलर सावळेश्वर ट्रॅक्टर्स भव्य शोरूम आपल्या सेवेत घेऊन आले आहे.लवकरच १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंतीच्या शुभमुहूर्तावर या भव्य शोरूमचे उद्घाटन संपन्न होणार असून ट्रॅक्टर घेणाऱ्या ग्राहकांसाठी शोरूमकडून भव्य बंम्फर ऑफर ठेवण्यात आली आहे.सुरुवातीला बुकिंग करणाऱ्या ग्राहकांना प्राधान्य देण्यात येणार असून यासाठी आकर्षक किंमत, आकर्षक व्याजदर आणि आकर्षक ऑफर असणार आहे. ट्रॅक्टर घेण्यासाठी इच्छुक असाल तर सावळेश्वर ट्रॅक्टर्स आष्टी येथील धोंडे पेट्रोल पंपा समोर अवश्य भेट देऊन आजच आपला शेतकऱ्यांचा साथीदार असलेला स्वराज ट्रॅक्टर बुकिंग करून सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा. संपर्क प्रो.प्रा.रमेश ( दादा )आजबे पाटील मो.८०५५९९८०५५, ९९२११ ३४१४३ यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

पान ६ वरून...

### वैयक्तिक लाभाच्या योजनेकरिता

घरकुल आवास योजना अशा प्रकारच्या योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी व अनु. जाती व जमातीच्या लाभार्थ्यांना याचा निरपेक्षपणे लाभ मिळण्यासाठी ग्रामसभेचा ठराव ही अट रद्द करणे आवश्यक आहे. ग्रामसभेचा ठराव ही अट रद्द केल्यामुळे अनु. जाती व जमातीचा लाभार्थी गावातील जातीय मानसिकतेला बळी पडणार नाही. गावातील राजकीय पुढाऱ्याकडून त्यांची होणारी आर्थिक लूट अवहेलना व कुचंबना बंद होईल व स्वाभिमानाने योजनेचा लाभ घेता येईल.

रमाई घरकुल आवास योजना ग्रामीण भागासाठी तुटपुंजी अनुदान दिले जाते. वाढती महागाई पाहता अनुदानाची रक्कम वाढवत ती ५ लाख रुपये पर्यंत करण्यात यावी अशी मागणी करण्यात येते. महात्मा फुले विकास महामंडळाला गेल्या अनेक वर्षापासून कसलाही प्रकारचा निधी दिलेला नाही करिता महात्मा फुले विकास महामंडळाला निधी द्यावा अशी मागणी करण्यात येत आहे. अशी मागणी वंचित बहुजन आघाडी बीड जिल्ह्याच्या वतीने करण्यात आली आहे त्यावेळी जिल्हाध्यक्ष अजय सरवदे, युवक जिल्हाध्यक्ष अनुरथ वीर, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष अनितानाई चक्रे, सम्यक विद्यार्थी आंदोलन जिल्हाध्यक्ष रोहन मगर, पुष्पाताई तुरुकमाने, ज्ञानेश्वर कवठेकर, अर्जुन जवंजाळ, डॉ.गणेश खेमाडे, भारत तांगडे,लखन जोगदंड, मिलिंद सरपते,पुरुषोत्तम वीर, राजेश कुमार जोगदंड, सचिन मेघडंबर, किरण वाघमारे, पप्पू गायकवाड, बाळासाहेब गायकवाड राहुल शिरोळे, प्रदीप उबाळे, संदीप जाधव, वंश शिंदे, अंशुमन शिंदे, राज शिंदे, आनंद शिंदे, स्वप्निल शिंदे, देवा गव्हाणे राजेंद्र कांबळे ज्ञानेश्वर शिंदे अन्वर सय्यद अहमद पठाण, उमेश गुळवे सिद्धार्थ आगे कैलास वीर नवनाथ गायकवाड ज्ञानेश्वर हवाले राजेंद्र पोकळे प्रेम कांबळे विष्णू दादा देवकते भीमराव अवसरमल अमोल आहेर बोराडे महाराज, धम्मानंद साळवे, अंकुश जाधव यांच्यासह असंख्य पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

## अंजनपूर येथे 'पीएम प्रणाम'योजना जनजागृती कार्यक्रम

### रासायनिक खताची कार्यक्षमता वाढवण्यासाठी एफओएमचा वापर फायदेशीर : शिवप्रसाद येळकर

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

देशात दिवसेंदिवस रासायनिक खतांचा वापर वाढत चालत्रला असून यामुळे जमीन, पाणी व हवा दूषित होत आहे. त्यामुळे सजिवांच्या आरोग्यास हानी पोहचत असून पिकांचे उत्पादन व उत्पादकता यांवरही विपरित परिणाम झाला आहे. शेतकऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात चळवळ उभी करुन पृथ्वी मातेचे आरोग्य पुनर्पस्थापित करण्यासाठी अपेक्षित उपाययोजना करणे, नैसर्गिक किंवा सेंद्रिय शेतीस प्रोत्साहन देणे, रासायनिक खतांचा वापर कमी करून सेंद्रिय व जैविक खतांच्या वापरास चालना देणे तसेच संसाधने संवर्धन तंत्रज्ञानास प्रोत्साहन देऊन जमिनीचे आरोग्य सुधारण्यासाठी जनजागृती करण्याच्या हेतूने केंद्र सरकारने २०२३-२४ मध्ये पीएम प्रणाम अर्थात प्रधानमंत्री प्रोग्राम फ़ॉर रेस्टोरेशन, अवेयरनेस जनरेशन, नॉरिशमेंट अँड अमेलिएरेशन ऑफ़ मदर-अर्थ ही योजना सुरू केली आहे. या योजनेची जनजागृती करण्यासाठी केंद्र शासनाने मार्गदर्शक सूची प्रसारित केली असून ''पीएम प्रणाम - किसान संगोष्टी'' उपक्रम राबवण्याच्या सूचना दिल्या आहेत. शेतकऱ्यांमध्ये पीएम प्रणाम योजनेची जनजागृती करण्याच्या अनुषंगाने नॅचरल शुगरचे चेअरमन बी बी ठोंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली ऊस विकास अधिकारी शिवप्रसाद येळकर व कृषी विभागाचे कृषी सहाय्यक पंडित काकडे यांनी संयुक्त कार्यक्रम घेऊन शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. ऊस विकास अधिकारी येळकर यांनी रासायनिक खतांचा असंतुलित वापर केल्यामुळे होणारे तोटे विस्तृतपणे समजावून सांगून किण्वन प्रक्रिया केलेले सेंद्रिय खत अर्थात फर्मेंटेड ऑरगॅनिक मॅन्युअर (एफ ओ एम) सोबत रासायनिक खतांची भट्टी




लावून पिकांना दिल्यास रासायनिक खतांची कार्यक्षमता वाढेल तसेच जमिनीचा पोत सुधारण्यास मदत होईल बाबत माहिती दिली. येळकर यांनी सद्यस्थितीत ऊस पिकामधील अन्नद्रव्यांच्या कमतरतेमुळे निदर्शनास येणारी लक्षणे यांची निरीक्षणे शेतकऱ्यांना दाखवून व्यवस्थापनासाठी १३ : ०० : ४५ हे विद्राव्य खत ५ ग्रॅम, वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट चे मल्टीमायक्रोन्यूट्रिएंट २ मिली व वसंत ऊर्जा ५ मिली प्रति एक लिटर पाणी याप्रमाणे फवारणी करण्याचा सल्ला दिला. ऊस पिकामध्ये सद्यस्थितीत निदर्शनास येत असलेल्या ऊसावरील पोंगे मर व लोकरी माव्याच्या एकत्रित व्यवस्थापनासाठी क्लोरपायरीफॉस (२० टक्के प्रवाही) २० मिली प्रति किंवा सायपरमेथ्रीन (१० टक्के प्रवाही) १५ मिली किंवा फिप्रोनिल (५ टक्के एस.सी.) २० मिली प्रति दहा लिटर पाणी याप्रमाणे फवारणी करावी. लोकरी मावा पानांच्या खाली असल्याने व त्यावर लोकरीसारखे आवरण असल्याकारणाने कीटकनाशकाचे द्रावण किडी पर्यंत व्यवस्थित पोहोचण्यासाठी द्रावणास चिकटपणा येण्यासाठी उत्तम दर्जाचे स्टिकर १ मि.ली प्रति लिटर द्रावणामध्ये मिसळावे तसेच फवारणी करताना फवारणीचे द्रावण पानांच्या खालच्या बाजूने जाईल अशा पद्धतीने फवारणी करावी याची माहिती दिली. ऊस पिकामधील चाबुक काणी व्यवस्थापनासाठी प्रादुर्भावग्रस्त ऊसाचे बेट मुळासकट उपटून प्लास्टिकच्या पिशवीमध्ये घेऊन नष्ट करावे हे करत असताना काळी पावडर इतर ऊसावर किंवा शेतामध्ये पडणार नाही याची काळजी घ्यावी. काणी रोगाच्या प्रादुर्भाव व्यवस्थापनासाठी ॲझॉक्सीस्ट्रॉबीन १८.२ टक्के अधिक डायफेनोकोनाझोल ११.४ टक्के एससी या संयुक्त बुरशीनाशकाची १० मिली प्रति १० लिटर पाण्यातून फवारणी करावी याची माहिती दिली यावेळी मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. कृषी सहाय्यक पंडित काकडे यांनी नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (पोकरा) योजनेच्या अंमलबजावण्यासाठी करावयाची कार्यवाही बाबत विस्तृतपणे माहिती दिली, तलाठी सुहास चाटे यांनी ॲग्री स्टॅक पोर्टल बाबत विस्तृत माहिती दिली, अदामा कंपनीचे प्रतिनिधी अविनाश पवार यांनी ऊस पिकामधील तण व्यवस्थापनाची माहिती दिली, आत्माचे चव्हाण व बर्दापुरे यांनी शेतकरी बचत गट स्थापन करण्यासाठी लागणारी कागदपत्रे यांची माहिती दिली यावेळी नॅचरल शुगरचे संचालक संभाजी रेड्डी, कृषी सहाय्यक चांगदेव आदमाने व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

cmyk

# ऊस तोडणी मुकादमांकडील वसुलीबाबत कार्यवाही करा - राजू शेट्टी



मुंबई : गेल्या वर्षभरामध्ये संपुर्ण राज्यात जवळपास २ हजार हून अधिक ऊस वाहतूकदारांनी दिलेल्या तक्रारीवरून आर्थिक फसवणूक केलेल्या ऊस तोडणी मुकादमावर गुन्हे दाखल झालेले आहेत. यासंदर्भात राज्य सरकारने तातडीने बैठक घेऊन वसुलीसंदर्भात कार्यवाही करण्याची मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मंत्रालयात वाहतूकदार शिष्टमंडळासमवेत भेट घेऊन केली.

राज्यातील ऊस तोडणी मुकादमांवर ४२० व इतर कलमांअंतर्गत गुन्हे दाखल होऊनही याबाबत पोलिस यंत्रणेकडून कोणतीच कार्यवाही झालेली नाही. राज्यातील बड्या नेत्यांच्या वरदहस्तामुळे वाहतूकदार यांची फसवणूक केलेले मुकादम बिनबोभाट फिरू लागले आहेत. हे गुन्हे निपटारा होण्यासाठी फार कालावधी होत आहे. त्यामुळे ऊस वाहतूकदारांना बँका व पतसंस्थांच्या मुद्दल व व्याजाचा भुर्दंड बसत असून ऊस वाहतूकदार पूर्णपणे उद्ध्वस्त होत आहेत, यामुळे विशेष बाब म्हणून ४२० अंतर्गत कायद्यामध्ये योग्य तो बदल करून फसवणूक करणाऱ्यांचे गुन्हे फास्टट्रॅक कोर्टामध्ये चालवून तातडीने निर्णय लावण्याची मागणी करण्यात आली.

वसुलीसाठी गेलेल्या पोलिसांना व वाहतूकदार यांना खोट्या गुन्ह्यांत अडकवून वाहतूकदार यांचा कोट्यवधी रुपयांचा ॲडव्हान्स बुडविण्याचा कट रचला जात आहे. ज्या मुकादमांवर गुन्हे दाखल झालेले आहेत त्यांच्या स्थावर मालमत्तेवर वाहतूकदारांनी ॲडव्हान्स पोटी दिलेल्या रकमेइतका महसुली बोजा चढवून वसुलीबाबत यंत्रणा गतिमान करणे गरजेचे आहे. यामुळे राज्य सरकारने ऊस तोडणी मजुरांकरिता सुरू केलेल्या गोपीनाथ मुंडे ऊसतोडणी महामंडळात ऊस वाहतूकदार यांचाही समावेश करून राज्यातील ऊस वाहतूकदार यांनाही सरंक्षण देण्याची मागणी करण्यात आली. या वेळी संदीप राजोबा, राजू पाटील, रावसाहेब अबदान, दादा पाटील, विनोद पाटील, तानाजी पाटील यांच्यासह वाहतूकदार संघटनेचे पदाधिकारी ऊपस्थित होते.

# औषधी सर्पगंधाची लागवड करा अन् मिळवा लाखोंचे उत्पन्न

आजच्या काळात शेतकऱ्यांसाठी एकापेक्षा एक चांगले पर्याय अस्तित्वात आहेत. या पर्यायाद्वारे शेतकरी आपले उत्पन्न वाढवत आहेत आणि इतर शेतकऱ्यांनाही प्रोत्साहित करीत आहेत. या काळात औषधी वनस्पतींची लागवड ही शेतकऱ्यांसाठी एक उत्तम पर्याय आहे. सर्वात चांगली गोष्ट म्हणजे, या वनस्पतींच्या लागवडीचा खर्च खूपच कमी असतो, ज्यामुळे जास्त नफा होतो. औषधे तयार करण्याच्या त्यांच्या वापरामुळे त्यांची मागणी नेहमीच कायम राहते. त्यांना बाजारात नेहमी मागणी असते. अशी एक महत्वपूर्ण औषधी वनस्पती म्हणजे सर्पगंधा आहे. ही आशिया खंडातील वनस्पती मानली जाते. आपल्या देशात उत्तर प्रदेश, बिहार, झारखंड, ओडिशा, तामिळनाडू, आंध्र प्रदेश, केरळ आणि महाराष्ट्र या राज्यांत मोठ्या प्रमाणात याची लागवड होत आहे. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, भारतात ४०० वर्षांपासून सर्पगंधाची लागवड कोणत्या ना कोणत्या स्वरूपात होत आहे. हे स्मृतिभ्रंश आणि उन्माद यासारख्या रोगांच्या निदानात वापरले जाते. साप आणि इतर कीटकांच्या चाव्यावरही याचा उपयोग होतो.

योग्य माती व हवामान : सर्पगंधाच्या चांगल्या उत्पादनासाठी उष्ण आणि अधिक दमट हवामान योग्य आहे. सुमारे १० ते ३८ अंश सेंटीग्रेड तापमानात याची यशस्वी लागवड करता येते. वालुकामय चिकणमाती, चिकणमाती आणि भारी जमिनीतही याची लागवड केली जाते. यासाठी जमिनीत पुरेशा प्रमाणात सेंद्रिय पदार्थ असावेत. मातीचा मूल्य ८.५ पेक्षा जास्त नसावे.

सर्पगंध लागवडीसाठी योग्य वेळ : सर्पगंधाच्या लागवडीसाठी उष्ण व दमट हवामान योग्य आहे. बियाण्याद्वारे लागवड करायची असल्यास मुख्य शेतात रोपे लावण्यापूर्वी रोपवाटिका तयार केली जाते. मे-जून हा महिना रोपवाटिकेच्या तयारीसाठी योग्य आहे. रोपवाटिकेत तयार केलेली रोपे ऑगस्टमध्ये लावावीत.

शेत तयार करण्याची पद्धत : शेत तयार करण्यासाठी प्रथम एकदा खोल नांगरणी करावी. खोल नांगरणीनंतर प्रति एकर जमिनीत ४-५ टन कुजलेले शेण टाकावे. यानंतर शेतात २ ते ३ वेळा हलकी नांगरणी करून पाटा लावावा. त्यानंतर शेतात बेड तयार करा. यामुळे सिंचन आणि तण नियंत्रण सुलभ होते. सर्व बेडमध्ये ६० सेमी अंतर ठेवा. मुख्य शेतात रोपे लावताना सर्व झाडांमध्ये ३० सेमी अंतर ठेवावे.

बियाण्याचे प्रमाण आणि बीजप्रक्रियेची पद्धत : प्रति एकर लागवडीसाठी ३.२ ते ४ किलो बियाणे लागते. पेरणीपूर्वी बियाण्यास थिरम २ ग्रॅम प्रति किलो या प्रमाणात प्रक्रिया करावी. सर्पगंधाच्या झाडांची लांबी ३० ते ७५ सें.मी. त्याची पाने १० ते १५ सेमी लांब आणि चमकदार हिरव्या रंगाची असतात.

बियाणे : या पद्धतीने लागवडीसाठी रोपवाटिकेत बिया पेरून रोपे तयार केली जातात. पेरणीपूर्वी सुमारे २४ तास बिया पाण्यात ठेवा. त्यामुळे बियाणे अंकुरणे सोपे होते. पेरणीनंतर ६ आठवड्यांनंतर मुख्य शेतात रोपे लावता येतात. रोपांची उंची सुमारे १० ते १२ सेमी असताना पुनर्लावणी करा.

पेन द्वारे : कटिंग रोपांची मुळे आणि स्टेम दोन्हीपासून बनवता येते. स्टेम बाय स्टेम तयार करण्यासाठी, १५ ते २० सेमी लांबीच्या काड्या कापून घ्या. प्रत्येक स्टेममध्ये २ ते ३ नॉट्स असावेत. या पेनचे रोपवाटिकेत प्रथम रोपण करा. साधारण ४ ते ६ आठवड्यांत मुळे तयार होऊ लागतात. मुळे तयार झाल्यानंतर, झाडे काळजीपूर्वक काढून टाका आणि मुख्य शेतात त्यांचे पुनर्रोपण करा.

मुळांद्वारे कलम करणे : मुळापासून कलमे तयार करण्यासाठी मुळे २.५ ते ०५ सें.मी. यानंतर रोपवाटिकेत मुळांची पुनर्लावणी करावी. साधारण ०३आठवड्यांत कळ्या दिसायला लागतात. कळ्या बाहेर येण्यासाठी रोपांची मुख्य शेतात पुनर्लावणी करा.

सिंचन आणि तण नियंत्रण : सर्पगंधाच्या झाडांना जास्त सिंचनाची गरज नसते. उन्हाळी हंगामात २० ते २५ दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे. थंड हवामानात आवश्यकतेनुसार पाणी द्यावे. पाऊस पडला की सिंचनाची गरज नसते. जमिनीत ओलावा कमी होऊ देऊ नका. ओलाव्याअभावी उत्पादनातही घट होते. निरोगी झाडे आणि उच्च उत्पादनासाठी तणांचे नियंत्रण खूप महत्वाचे आहे. रोपे लावल्यानंतर १५ ते २० दिवसांनी पहिली खुरपणी करावी. यानंतर कुदळाच्या साहाय्याने गरजेनुसार खुरपणी व कुदळ काढत रहा.सर्पगंधाच्या लागवडीतील रोग आणि त्याचे निदान : सर्पगंधा लागवडीमध्ये तण आणि रोगांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात नुकसान करतो. पिकाच्या सुरुवातीच्या अवस्थेत तणांचा प्रादुर्भाव जास्त दिसून येतो. ते शेतात पूर्णपणे पसरते आणि पिकाला पूर्णपणे झाकून टाकते, ज्यामुळे झाडे कोवळ्या अवस्थेत मरतात. पिकाच्या चांगल्या उत्पादनासाठी आणि जास्त नफ्यासाठी तण आणि रोगांचे नियंत्रण आवश्यक आहे.



# झिनिया फूलशेती! एक चांगला उत्पन्न देणारा पर्याय



झिनियाचे फुल म्हटले की, आपल्या डोळ्यासमोर येतात ती रंगबिरंगी नाजूक फुले. झिनीयाचे फुल हे खुप आकर्षक असते. विविध रंगातील टपोरे झिनिया हे अनेकांचे आवडते फुल असते. हे नेहमी आपल्याला घरासमोर कुंडीत, बगिचेमध्ये दिसत असते पण या फुलांची लागवड ही फार कमी प्रमाणात व्यापारी तत्वावर केली जाते.

मेक्सिको हे या फुलाचे उगमस्थान जरी असले तरी, त्याची लागवड भारतात फार वर्षपासून सूरु झाली आहे. या फुलाच्या लागवडीसाठी उष्ण आणि दमट हवामान लागते. खूप जास्त थंडी या झाडाला मानवत नाही. या फुलांसाठी जमीन ही मध्यम काळी ते भारी काळी जमीन लागते. पण मुरमाड जमिनीत जर चांगल्या प्रकारे शेणखत वगैरे टाकले तर तेथेही याचे उत्पादन येऊ शकते.

झिनिया फुलाच्या उन्नत जाती : १) झिनिया लिनीओरिसा(बटन झिनिया). २)झिनिया इलेगनस(गेंदा झिनिया). ३)झिनिया हजेना(बुटका झिनिया).

झिनियची लागवड : लागवड ही मुख्यतः जुलै-ऑगस्ट महिन्यामध्ये केली जाते. लागवड करताना दोन रोपांमधील व दोन ओळींमधील अंतर हे ४५ बाय ४५ सेंटीमीटर असे असावे. गादीवाफ्यावरील रोपांची वाढ १५ सेंटीमिटर किंवा जास्त झाली असली तर लागवडीच्या वेळी रोपांचे शेंडे खुडून रोपे लावावीत. यामुळे फुलांचा बहर चांगला येतो. या फुलांच्या झाडाच्या लागवडीसाठी जवळच्या कृषी केंद्रावर रोपे उपलब्ध होऊ शकतील. यामुळे फुलांची शेती करत असाल तर हा एक चांगला पर्याय होऊ शकतो.




## जागतिक दिवस
## वॅलेन्टाइन्स डे

### महत्वाच्या घटना

१६२८ : आजच्या दिवशी मुघल सम्राट शाहजहा आग्र्या च्या गादीवर बसला.
१८७६ : अलेक्झांडर ग्रॅहम बेल व एलिशा ग्रे यांनी एकाच दिवशी टेलिफोनच्या पेटंटसाठी अर्ज केला.
१८८१ : भारतातील पहिल्या होमिओपाथिक कॉलेजची कोलकाता येथे स्थापना
१८९९ : अमेरिकेत निवडणुकांसाठी मतदान यंत्रे वापरण्यास सुरूवात झाली.
१९२० : अमेरिकेच्या शिकागो येथे महिला मतदारांच्या लीग ची स्थापना करण्यात आली.
१९२४ : संगणक तयार करणारी कंपनी आय.बी.एम ची स्थापना.
१९४५ : चिली, इक्वेडोर, पॅराग्वे व पेरू या देशांचा संयुक्त राष्ट्रांत प्रवेश
१९४५ : दुसरे महायुद्ध रॉयल एअर फोर्स च्या विमानांनी तुफानी बॉम्बफेक करुन जर्मनीतील ड्रेस्डेन शहर बेचिराख केले.
१९४६ : बँक ऑफ इंग्लंडचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले.
१९४६ : पहिला संगणक 'एनियाक' युनिव्हर्सिटी ऑफ पेनसिल्व्हेनियात प्रदर्शित करण्यात आला.
१९६३ : अणुक्रमांक १०३ असलेले लॉरेन्सिअम हे मूलद्रव्य प्रथमच तयार करण्यात आले.
१९८९ : ईराणच्या आयातोल्ला खोमेनीने ब्रिटिश लेखक सलमान रश्दीच्या खूनाचा फतवा काढला.
१९८९ : भोपाळ दुर्घटनेबद्दल भारत सरकारला ४७,००,००,००० अमेरिकन डॉलर नुकसान भरपाई देण्याचे यूनियन कार्बाईडने कबूल केले.
२००० : अभिजित कुंटे हा भारताचा चौथा आणि महाराष्ट्राचा दुसरा ग्रँडमास्टर बनला.
२००३ : नाटककार महेश एलकुंचवार यांची के.के. बिर्लाफांउंडेशनतर्फे दिल्या जाणार्या सरस्वती सन्मानासाठी निवड
२००५ : आजच्या दिवशी यु ट्यूब ची स्थापना करण्यात आली.
२००६ : आजच्या दिवशी सद्दाम हुसेन न्यायधीशांच्या विरोधात उपोषणावर बसले.
२००९ : सानिया मिर्झा चा आजच्या दिवशी पट्टाया ओपन टेनिस च्या अंतिम फेरीत प्रवेश.
२०१९ : ला आतंकवाद्यांनी पुलवामा येथे केंद्रीय बलाच्या सैनिकांची वाहतूक करणाऱ्या ताफ्यावर बॉम्बस्फोट घडवून आणला, त्यामध्ये ४० सैनिक शहीद झाले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१४८३ : बाबर पहिला मुघल सम्राट, हिन्दुस्थानातील मुघल सत्तेचा संस्थापक (मृत्यू: २६ डिसेंबर १५३०)
१९१४ : जान निसार अख्तर ऊर्दू शायर व गीतकार (मृत्यू: ९ ऑगस्ट १९७६)
१९१६ : संजीवनी मराठे कवयित्री (मृत्यू: १ एप्रिल २०००)
१९२५ : मोहन धारिया केन्द्रीय मंत्री व सामाजिक कार्यकर्ते (मृत्यू: १४ आक्टोबर २०१३)
१९३३ : मुमताज जहाँ बेगम देहलवी ऊर्फ मधुबाला अभिनेत्री (मृत्यू: २३ फेब्रुवारी १९६९ मुंबई)
१९५० : कपिल सिबल वकील आणि केंद्रीय मंत्री
१९५२ : भारतीय जनता पार्टी च्या महिला राजनीतिज्ञ तसेच केंद्रात मंत्री राहिलेल्या सुषमा स्वराज यांचा जन्म.
१९६० : पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित निरंजनानंद सरस्वती यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१४०५ : तैमूरलंग मंगोलियाचा राजा (जन्म: ८ एप्रिल १३३६)
१९६४ : भारतीय प्रशासन अधिकारी वी.टी. कृष्णमाचारी यांचे निधन.
१९७४ : श्रीकृष्ण नारायण रातंजनकर आग्रा घराण्याचे गायक, शास्त्रीय संगीताचे गाढे अभ्यासक व संगीत गुरू (जन्म: १ जानेवारी १९००)
१९७५ : ज्यूलियन हक्सले ब्रिटिश जीवशास्त्रज्ञ (जन्म: २२ जून १८८७)
१९८० : भारतीय चित्रपट दिग्दर्शक मनहर रसकपूर यांचे निधन.
१९९५ : इंग्लिश लेखक पी. जी. वूडहाऊस यांचे निधन. (जन्म: १५ ऑक्टोबर १८८१)
२००५ : हिंदी साहित्यकार तसेच प्रसिद्ध लेखक विद्यानिवास मिश्र यांचे निधन.
२००७ : मध्य प्रदेश चे माजी मुख्यमंत्री श्यामाचरण शुक्ल यांचे निधन.

# फेब्रुवारीमध्ये करा या टॉप ५ पिकांची लागवड मिळेल चांगले उत्पादन

फेब्रुवारी हा महिना तुमच्या शेतात किंवा किचन गार्डनमध्ये अनेक भाज्या आणि पिके वाढवण्यासाठी सर्वोत्तम महिना मानला जातो. कोणती पिके फेब्रुवारीमध्ये लागवड करायची जेणेकरून चांगले फायदे मिळू शकतील असा प्रश्न तुम्हाला पडला असेल. दुसरीकडे, हवामान आणि बाजाराची वेळ लक्षात घेऊन शेतकऱ्यांनी फेब्रुवारीमध्ये पिकांची पेरणी करावी, जेणेकरून त्यांना बाजारात मागणीनुसार चांगला भाव मिळू शकेल.

१) दोडका : या भाजीची लागवड भारतातील जवळजवळ सर्व राज्यांमध्ये केली जाते. याशिवाय फळामध्ये पाण्याचे प्रमाण जास्त असल्याने ते अनेक आरोग्य फायद्यांसाठी देखील ओळखले जाते. दोडक्याच्या शेतीला उष्ण आणि दमट हवामान आवश्यक असते आणि निचरा होणारे जीवाणू असलेल्या सर्व प्रकारच्या जमिनीत पेरणी करता येते. दोडक्याची लागवड सुरू करण्यासाठी फेब्रुवारी हा सर्वोत्तम महिना असून त्याला बाजारातही मोठी मागणी आहे. सुधारित वाण - पुसा स्नेह, काशी दिव्या, स्वर्ण प्रभा, कल्याणपूर हरी चिकनी, राजेंद्र १, पंत चिकन १ या त्याच्या जाती आहेत.

२) मिरची : मिरचीच्या सुधारित जातींमध्ये काशी अनमोल, काशी विश्वनाथ, जवाहर मिर्च-२८३, जवाहर मिर्च-२१८, अर्का सुफल आणि काशी अर्ली, काशी सुर्ख किंवा काशी हरिता या संकरित वाणांचा समावेश होतो जे अधिक उत्पादन देतात. ३) कारले : बाजारामध्ये भरपूर मागणी असण्यासोबतच कारल्याचा अनेक रोगांवर फायदा होतो. यातून शेतकरी भरपूर कमाई करू शकतात. कारले ची शेती भारतातील अनेक प्रकारच्या मातीत उगवता येते. चांगली निचरा होणारी जिवाणू असलेली माती कारल्याच्या चांगल्या वाढीसाठी आणि उत्पादनासाठी योग्य मानली जाते. कारल्याच्या जाती - शेतकऱ्यांमध्ये कारला पुसा ते हंगामी, पुसा स्पेशल, कल्याणपूर, प्रिया सीओ-१, एसडीयू-१, कोईम्बतूर लांब, कल्याणपूर सोना, बारमाही कारला, पंजाब कडू-१, पंजाब-१४, सोलन हारा, सोलन आणि बारमाही यांचा समावेश आहे.

४) दुधी भोपळा : दुधी भोपळ्यामध्ये प्रथिने, कार्बोहायड्रेट आणि पाणी याशिवाय जीवनसत्त्वेही पुरेशा प्रमाणात असतात. दुधी भोपळ्याची शेती डोंगराळ भागापासून मैदानापर्यंत केले जाते. त्याच्या लागवडीसाठी उष्ण आणि दमट हवामान आवश्यक आहे. थेट पेरणीसाठी बियाणे पेरणीपूर्वी २४ तास पाण्यात भिजवावे. हे बियाणे उगवण प्रक्रियेला गती देते. या प्रक्रियेनंतर बियाणे शेतात पेरणीसाठी तयार होते. दुधी भोपळा जाती - जातींमध्ये पुसा शांती, पुसा संदेश (गोल फळे), पुसा समृद्धी आणि पुसा हायब्रिड ३, नरेंद्र रश्मी, नरेंद्र शिशिर, नरेंद्र स्ट्रीप, काशी गंगा आणि काशी बहार यांचा समावेश होतो. ५) भेंडी : 'लेडी फिंगर' किंवा 'भेंडी' ही भारतातील सर्वात आवडती आणि आरोग्यदायी भाज्यांपैकी एक आहे. याशिवाय, ही अशी भाजी आहे जी देशाच्या जवळजवळ प्रत्येक भागात घेतली जाऊ शकते. भेंडीच्या शेतीसाठी तीन मुख्य लागवड हंगाम फेब्रुवारी-एप्रिल, जून-जुलै आणि ऑक्टोबर-नोव्हेंबर आहेत. सध्या लेडीज फिंगरच्या अनेक चांगल्या जाती आहेत ज्या शेतकऱ्यांना चांगले उत्पादन देतात.

भेंडीच्या जाती - फेब्रुवारी महिन्यात घेतल्या जाणाऱ्या भेंडीच्या लागवडीसाठी पुसा ए-४, परभणी क्रांती, पंजाब-७, अर्का अभय, अर्का अनामिका, वर्षा उपहार, हिसार उन्नत, व्हीआरओ-६ यांचा समावेश आहे.




# वैयक्तिक लाभाच्या योजनेकरिता ग्रामसभेच्या ठरावाचा निकष रद्द करा

## वंचित बहुजन आघाडीची प्रशासनाकडे मागणी

बीड । प्रतिनिधी

विशेष घटक योजना, ओटीएसपी, रमाई घरकूल योजना या योजना अनु.जाती व जमातीच्या लाभार्थ्यांना अर्थ सहाय्य देवून त्यांची उन्नती करण्यासाठी शासनामार्फत विविध योजना राबविण्यात येतात. सदरील योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज सादर करतांना ग्रामसभेचा ठराव जोडावा असे नमूद केले जाते.

ग्रामसभेचा ठराव अर्ज भरण्यासाठी अनिवार्य असल्यामुळे अनेक लाभार्थी अर्ज भरण्यापासून वंचित राहतात. गावपातळीवरील राजकीय हेवेदावे तसेच जातीय समीकरण यातून निर्माण झालेले विविध समूहाचे गट यामुळे अनू. जाती व जमातीच्या लाभार्थ्यांना ग्रामसभेचा ठराव मिळविणे जिकरीचे जाते. भारतीय समाज हा जातीय व्यवस्थक असल्यामुळे गावातील राजकारणामध्ये अनु.जाती व जमातीच्या समुहाला दुय्यम वागणूक देण्यात येते. कोणत्याही योजनेचा लाभ देण्यासाठी गावातील पुढारपण करणारे नेतृत्व मी तुम्हाला लाभ मिळवून देतो अशी उपकाराची व वर्चस्वाची भावना ठेवतो.



त्यामुळे या समूहाला अंकित ठेवण्यासाठी गावपातळीवर ग्रामसभेच्या ठरावाचा हत्यार म्हणून वापर केला जातो हे सर्व ज्ञात आहे. त्यामुळे विघयो, ओटीएसपी, रमाई घरकुल आवास योजना अशा प्रकारच्या योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी व अनु. जाती व जमातीच्या लाभार्थ्यांना याचा निरपेक्षपणे लाभ मिळण्यासाठी ग्रामसभेचा ठराव ही अट रद्द करणे आवश्यक आहे. ग्रामसभेचा ठराव ही अट रद्द केल्यामुळे अनु. जाती व जमातीचा लाभार्थी गावातील जातीय मानसिकतेला बळी पडणार नाही. गावातील राजकीय पुढाकाऱ्याकडून त्यांची होणारी आर्थिक लूट अवहेलना व कुचंबना बंद होईल व स्वाभिमानाने योजनेचा लाभ घेता येईल.

रमाई घरकुल आवास योजना ग्रामीण भागासाठी तुटपुंजी अनुदान दिले जाते. वाढती महागाई पाहता अनुदानाची रक्कम वाढवत ती ५ लाख रुपये पर्यंत करण्यात यावी अशी मागणी करण्यात येते. महात्मा फुले विकास महामंडळाला गेल्या अनेक वर्षापासून कसलाही प्रकारचा निधी दिलेला नाही करिता महात्मा फुले विकास महामंडळाला निधी द्यावा अशी मागणी करण्यात येत आहे. अशी मागणी वंचित बहुजन आघाडी बीड जिल्ह्याच्या वतीने करण्यात आली आहे त्यावेळी जिल्हाध्यक्ष अजय सरवदे, युवक जिल्हाध्यक्ष अनुरथ वीर, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष अनितातातई चक्रे, सम्यक विद्यार्थी आंदोलन जिल्हाध्यक्ष रोहन मगर, पुष्पाताई तुरुकमाने, ज्ञानेश्वर कवठेकर, अर्जुन जवंजाळ, डॉ.गणेश खेमाडे, भारत तांगडे,लखन जोगदंड, मिलिंद सरपते,पुरुषोत्तम वीर, राजेश कुमार जोगदंड, सचिन मेघडंबर, किरण वाघमारे, पप्पू गायकवाड, बाळासाहेब गायकवाड राहुल शिरोळे, प्रदीप उबाळे, संदीप जाधव, वंश शिंदे, अंशुमन शिंदे, राज शिंदे, आनंद शिंदे, स्वप्निल शिंदे, देवा गव्हाणे राजेंद्र कांबळे ज्ञानेश्वर शिंदे अन्वर सय्यद अहमद पठाण, उमेश गुळवे सिद्धार्थ आगे कैलास वीर नवनाथ गायकवाड ज्ञानेश्वर हवाले राजेंद्र पोकळे प्रेम कांबळे विष्णू दादा देवकते भीमराव अवसरमल अमोल आहेर बोराडे महाराज, धम्मानंद साळवे, अंकुश जाधव यांच्यासह असंख्य पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# किनगाव राजाची लखन-दुर्गा बैलजोडी ठरली रांजणी केसरीची मानकरी

## बैलजोडी मालकला सतीश घाटगेकडून मिळाली दुचाकी भेट



घनसावंगी । प्रतिनिधी

जालना जिल्ह्यात पहिल्यांदा समृद्धी साखर कारखान्यामार्फत सतीश घाटगे यांनी रांजणी येथे आयोजित भव्य बैलगाडा शर्यतीस बैलगाडा प्रेमींचा उदंड असा प्रतिसाद मिळाला. ही भव्य दिव्य स्पर्धा सर्वांना वेगळा आनंद देऊन गेली. सहभागी प्रत्येक धुरकरी आणि बैलगाडा मालकांनी प्रेक्षकांची मने जिकंली. या स्पर्धेतील विजेत्या बैलगाडा मालक व धुरकरी यांचा सतीश घाटगे यांच्या हस्ते सन्मान करून बक्षीस वितरण करण्यात आले.

राज्यभरातील ११० नावाजलेल्या बैलजोडी या स्पर्धेत सहभागी झाल्या होत्या. दोन दिवस ही स्पर्धा रंगातदार ठरली. ग्रामीण संकृतीचे दर्शन घडविणाऱ्या शंकरपटाचा थरार आणि रोमांचकारी शर्यतीचा आनंद या स्पर्धेमुळे बैलगाडा प्रेमींना अनुभवता आला.या स्पर्धेतील नंबर एकचे बक्षीस किनगाव राजा येथील लखन आणि दुर्गा या बैलजोडीने पटकावले. ५.८५ मिली सेकंदात या जोडीने मैदान सर करून आपल्या धन्यासाठी रांजणी केसरीचा मान पटकावला. त्यांना बक्षीस म्हणून समृद्धी कारखान्यामार्फत दुचाकी भेट देण्यात आली. तसेच दुसऱ्या क्रमांकाचे बक्षीस कानफोडी येथील महाराजातुफान या बैलजोडीने पटकावले तर तिसरे बक्षीस शंकर डायमंड या जोडीने मिळविले.दोन्ही बैलजोडी मालकांना स्कुटी बक्षीस देण्यात आली. या स्पर्धेत खऱ्या अर्थाने घडीवाले रणजित राठोड यांनी रंगत आणली. आपल्या बहारदार समालोचनाने त्यांनी मने जिंकली सोबत स्पर्धेतील प्रत्येक बैलजोडीचा टायमिंग अचूकपणे टीपण्याचे काम त्यांनी केले.रांजणी येथील आफरोज तांबोली मित्र मंडळ, अशफाक पठाण, आमेर कुरेशी, सलमान तांबोली, शेख सलाम, बबलू तांबोली,रमेश मोरे, शाम लगामे, रोहीत दाभाडे,अतीक तांबोली यांचे उत्कृष्ट नियोजना बद्दल घाटगे यांनी कौतुक केले.

# यशोदीप ब्रिलियंट अकॅडमी अबॅकस सेंटरच्या मुलांचे घवघवीत यश




अंबड । प्रतिनिधी

मुंबई-ठाणे येथे झालेल्या नॅशनल अबॅकस स्पर्धेत अंबड येथील मापारी सर यांच्या यशोदीप ब्रिलियंट अकॅडमी अबॅकस सेंटरच्या मुलांनी घवघवीत यश मिळविले असून या स्पर्धेत वरद डवले याने ''आय'' कॅटेगिरीतून भारतातून प्रथम क्रमांक तर ''एच थ्री'' कॅटेगरीतून सम्यक वाघमारे यानेही प्रथम क्रमांक तसेच जी कॅटेगिरीतून कल्याणी पावशे हीने भारतातून प्रथम ''एच वन'' कॅटेगिरीतून अजिंक्य भोजने याने भारतातून पहिला तर युवराज येवले याने दुसरा क्रमांक पटकावला आहे.त्याचप्रमाणे या स्पर्धेत ''डी'' कॅटेगरीतून वरद बिरनावळे याने भारतातून दुसरा क्रमांक,ईश्वरी रामेश्वर हरणे हिने तिसरा क्रमांक,श्रावणी अडाणी व साई भांड यांनी चौथा क्रमांक मिळवला आहे. तसेच श्रावणी मुळे हीने चौथा क्रमांक तर कलश शेटे याने पाचवा क्रमांक मिळवला शिवाय स्वरूप बुरले याने उत्तेजनार्थ पारितोषिक मिळवले आहे.

विद्यार्थ्यांच्या घवघवीत यशाबरोबरच अंबड येथील यशोदीप ब्रिलियंट्स अकॅडमीने आपली यशाची पताका फडकवली असून या अबॅकस सेंटरला भारतातून प्रथम क्रमांक तर प्रशिक्षक प्रज्योती श्रीकृष्ण मापारी यांना भारतातून दुसरा क्रमांक मिळाला आहे. क्विज स्पर्धेत वरद डवले व सम्यक वाघमारे व श्रीकृष्ण मापारी सर या तिघांना मान्यवरांच्या हस्ते भारतातून प्रथम क्रमांकाचे रोख रक्कम १० हजार रुपये पारितोषिक व चार ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले. या यशाबद्दल या सर्व विजेत्या मुलांचे तसेच यशोदीप ब्रिलियंट अकॅडमी अबॅकस सेंटरचे अंबडमधील नागरिकांकडून कौतुक होत आहे. अंबडमधील डॉ. रामनाथ तिकांडे,शिवप्रसाद चांगले, माजी मुख्याध्यापक आर.जे.मापारी सर, विकास पवार, दीपक लोहकरे, एडवोकेट युवराज मापारी, पत्रकार संतोष जिगे पाटील, सुरेश भावले सुरेशराव काळे, राजू छल्लारे, अच्युत फालके, अफरोज पठाण, प्रकाश नारायणकर आदीसह अनेकांनी विजेत्यांचे अभिनंदन केले आहे.

# वडवणी तालुका मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने पोलिस स्टेशनला निवेदन

## पत्रकार पिसाळ यांच्यावर प्राणघातक हल्ला;हल्लेखोरांवर कठोर कारवाई करा

वडवणी । प्रतिनिधी

पत्रकार प्रसाद पिसाळ यांच्यावर खुनी हल्ला करणाऱ्या आरोपीवर गंभीर कारवाई करण्यात यावी. या मागणीसाठी वडवणी तालुका मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने वडवणी पोलीस स्टेशनमध्ये निवेदन देऊन मागणी करण्यात आली आहे.

सांगली जिल्ह्यातील विटा येथील पत्रकार प्रसाद पिसाळ यांच्यावर खुनी हल्ला करण्यात आला आहे. पत्रकार पिसाळ यांच्या वर हल्ला करणाऱ्या आरोपीवर गंभीर कारवाई व्हावी. या मागणीसाठी अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त मा.श्री.एस.एम.देशमुख सर यांच्या आदेशानुसार संपूर्ण राज्यात पोलिस स्टेशन मध्ये निवेदने दिली जात आहेत.



त्याअनुषंगाने डिजिटल मिडिया परिषदेचे राज्य अध्यक्ष अनिल वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली वडवणी तालुका मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने वडवणी पोलीस स्टेशनमध्ये रितसर तक्रारी निवेदन दाखल करण्यात आले आहे. या निवेदनात असे ही म्हटले आहे की,आपल्या पोलिस स्टेशनच्या माध्यमातून सदर प्रकरणी वरिष्ठांना याबाबत तातडीने कळवुन योग्य ती कारवाई करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे. या निवेदनावर डिजिटल मिडिया परिषदेचे राज्य अध्यक्ष अनिल वाघमारे,वडवणी तालुका मराठी पत्रकार परिषदेचे जेष्ठ मार्गदर्शक सुधाकर पोटभरे,तालुकाध्यक्ष सतिश सोनवणे सचिव महेश सदरे, डिजिटल मिडिया परिषदेचे तालुका अध्यक्ष ओमप्रकाश साबळे, उपाध्यक्ष धम्मपाल डावरे, कोषाध्यक्ष वाजेद पठाण, पत्रकार गितांजली लव्हाळे,पत्रकार विजय राऊत, पत्रकार अतुल जाधव, पत्रकार संभाजी लांडे, पत्रकार हरी पवार सह आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# जिल्ह्यात बारावी परिक्षेत कॉपीचे ११ गैरप्रकार

जालना । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य माध्यकमिक व उच्च माध्यमिक मंडळामार्फत इयत्ता १२ वी परीक्षेला कालपासून सुरुवात झाली आहे. दि.११ फेब्रुवारी, २०२५ ते दि. १८ मार्च, २०२५ या कालावधीत जालना जिल्ह्यातील एकुण ८२ उपकेंद्रावर इयत्ता १२ वीच्या परीक्षा पार पडणार आहेत. राज्य शासनामार्फत १२वी बोर्डाची परीक्षा कॉपीमुक्त परीक्षा राबवण्यासाठीचे विशेष अभियान चालवले जात आहे. त्यासाठी, जिल्हा प्रशासनाकडून विशेष प्रयत्न केले जात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणीवस यांनी ही या संदर्भात कठोर अमंलबजावणी करण्याचे आदेश दिलेले आहेत.

दि. ११ फेब्रुवारी, २०२५ रोजी इंग्रजी विषयाची परीक्षा पार पडली असुन, सदर परीक्षे दरम्यान श्रीमती इंदिरा गांधी विद्यालय रामनगर सा. केंद्र क्रमांक ४१८ वर ०३ कॉपीचे गैरप्रकार, सत्य शोधक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय गोषेगाव ता. भोकरदन केंद्र क्रमांक ४९२ वर ०४ कॉपीचे गैरप्रकार तर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, बदनापुर केंद्र क्रमांक ४२८ वर २ कॉपीचे गैरप्रकार निदर्शनास आले. तसेच आज (दि.१२ फेब्रुवारी) रोजी पार पडलेल्या हिंदी विषयाच्या परीक्षे दरम्यान सिध्देश्वर उच्च माध्यमिक विद्यालय ढोकसाळ मंठा ता. मंठा येथे २ कॉपीचे गैरप्रकार झाल्याबाबतचा अहवाल शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परीषद, जालना यांच्यामार्फत विभागीय सचिव विभागीय मंडळ कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांना सादर करण्यात आल्याचे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# सरस्वती विद्यामंदिरात विविध जिल्हास्तरीय स्पर्धा

बीड । प्रतिनिधी

येथिल शिवाजीनगर भागातील सरस्वती विद्यामंदिरात आज दिनांक-१३/२/२०२५ रोजी रंगभरण,निबंध लेखन व सामान्यज्ञान स्पर्धा संपन्न झाल्या.सदरील स्पर्धेचे उद्घाटन संस्कार विद्यालय बीड चे विभाग प्रमुख श्री.सोनवळकर सर, विनायक प्रा.विद्यालयाचे श्री.काशिद सर,यशोदिप आश्रमशाळा पालवणचे श्री.गिरे सर, राष्ट्रीय प्रा.विद्यालय बीड चे श्री.जोशी सर,श्री.सुरवसे सर तसेच प्रशालेचे मुख्याध्यापक श्री.गोरे सर आदि मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले. प्रसंगी व्यासपीठावरील



मान्यवरांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेचे विद्यार्थी जीवनातील महत्व पटवून दिले.

प्रशालेत संपन्न झालेल्या या स्पर्धेत बीड जिल्ह्यातील अनेक नामांकित प्रशालेच्या स्पर्धकांनी सहभाग नोंदवून स्पर्धेची शोभा वाढवल्याबद्दल संस्थेचे संस्थापक सचिव मा.श्री.उत्तमराव पवार साहेब तसेच प्रशालेचे मुख्याध्यापक श्री.गोरे सर आदींनी सर्व मुख्याध्यापक, मार्गदर्शक शिक्षक तसेच पालकांचे हार्दीक आभार मानले. सदरील स्पर्धेचे बक्षीस वितरण दिनांक.२२/२/२०२५रोजी सरस्वती विद्यामंदिरात भव्य अशा कार्यक्रमात प्रमुख मान्यवरांच्या हस्ते संपन्न होणार आहे.

## जाहिर प्रगटन

**मा. श्रीमती पी. डी. चव्हाण ४ थे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज १३१९/२०२५**

**ॲड.एम. आर. उबाळे**

**सिताबाई भ्र. केशव भिंगले व इतर विरुध्द निरंक**

अर्जदार : १. सिताबाई भ्र. केशव भिंगले, वय-७१ वर्षे, धंदा-घरकाम रा. बेलखंडी (पा), ता. जि. बीड ,२. चंद्रसेन पि. केशव भिंगले, वय-४१ वर्षे, धंदा-शेती रा. सदर, ३. संगिता भ्र. अंदाराम बजगुडे, वय-४१ वर्षे, धंदा-घरकाम रा. सदर, ४. सुनिता भ्र. सदाशिव वाळेकर, वय-३८ वर्षे, धंदा-घरकाम रा. कदमवाडी, ता. जि. बीड, ५. वैशाली भ्र. शिवाजी घोडके, वय-५० वर्षे, धंदा-घरकाम रा. साखरे बोरगांव, ता. जि. बीड (अर्जदार हे भारतीय आहेत)

विरुध्द निरंक

मागणी अर्ज:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत केशव पि. रंगनाथ भिंगले यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे ज्याअर्थी केशव पि. रंगनाथ भिंगले याचा मृत्यु दिनांक १८.०४.२०१० रोजी बेलखंडी (पा), ता. जि. बीड येथे झाला असुन अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी असुन अर्जदार क्र. २ हा मयताचा मुलगा आहे. अर्जदार क्र. ३ ते ५ हया मयताच्या विवाहीत मुली आहेत. हे कायदेशीर वारस आहे.वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की. सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत केशव पि. रंगनाथ भिंगले यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**आज दिनांक १३ फेब्रुवारी माहे २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. ०७ मार्च २०२५**

स्वाक्षरित
**क लिपीक**

(शिक्का)

आदेशावरून
स्वाक्षरित
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

# रेणुका देवीची शोभायात्रा काढून विधिवत प्राणप्रतिष्ठा

## साडेसहाशे भाविकांनी घेतला महाप्रसाद

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश जवळील कुंभारवस्ती येथे सोमवार १० फेब्रुवारी रोजी दुपारी एक वाजता स्थिर मुहूर्तावर बारवातील रेणुका देवीच्या तांदळ्याची विधिवत प्रतिष्ठापणा करण्यात आली.त्यांनतर साडेसहाशे भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.लिंबागणेश जवळील कुंभार वस्तीवर कुलकर्णी - लिंबेकर परिवाराच्या वतीने बारवातील रेणुका देवी मंदिराचे बांधकाम पूर्ण करण्यात आल्यांनतर शुक्रवार ७ फेब्रुवारी रोजी सकाळी ९.३० ते दुपारी १२ वाजेपर्यंत देवीचा तांदळा आहिल्यानगर ते अहमदपूर मार्गावरील कुंभारवस्ती रस्त्यावर ट्रॅक्टरमध्ये ठेवुन मंदिरापर्यंत भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणूकीत कुंभार वस्ती, रंधवे वस्तीसह मुळूक येथील ग्रामस्थ महिला मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. वस्तीवरील महिलांनी आपल्या घरासमोर रांगोळ्या काढून देवीच्या तांदळ्याचे स्वागत करत दर्शन घेतले.

कुंभार वस्तीवरील बारवातील रेणुका देवीच्या मंदिरात रविवार ९ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ९ ते दुपारी २ यावेळेत तांदळा प्रतिष्ठापणे पूर्वी गणेश पुजन, पुण्याहन वाचन, दशविधी स्नान, शय्या निवास करण्यात आल्यांनतर



महाआरती करण्यात आली.तर सोमवार १० फेब्रुवारी रोजी सकाळी ८ ते १२ यावेळेत प्रात:देवता पुजन, अग्नीमंथन, अग्नीस्थापणा, देवता स्थापणा होमहवन कार्यक्रम पार पडले. या कार्यक्रमाचे पौराहित्य रवी कुलकर्णी व अभय कुलकर्णी यांनी केले. कुंभारवस्तीवरील रेणुका देवीच्या मंदिरासमोर सोमवारी दुपारी १२ वाजता पूर्णाहुती व महाआरतीनंतर देवीच्या तांदळ्याची विधिवत प्रतिष्ठापणा करण्यात आली. त्यानंतर दुपारी तीन वाजता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. तांदळा प्रतिष्ठापणा सोहळ्यास अशोक कुलकर्णी, सुरेश कुलकर्णी, रमेश कुलकर्णी, भरत कुलकर्णी, गणेश लिंबेकर, चंद्रकांत कुलकर्णी, विनायक कुलकर्णी, संतोष लिंबेकर, दिनेश लिंबेकर, सुधीर लिंबेकर, विजय कुलकर्णी, केशव कुलकर्णी, सतीश कुलकर्णी, सुर्यकांत कुलकर्णी , अनिल कुलकर्णी, सखाराम कुलकर्णी, दिपक कुलकर्णी, शुभंम लिंबेकर, दिनेश कुलकर्णी, भाग्येश लिंबेकर, यांच्यासह गणपत कुंभार, नारायण ढगारे, भारत जगताप, दादासाहेब ढास, भिमराव रंधवे, श्रीमंत आहेरकर, दिलीप ढास, शहादेव आहेरकर ,बालाजी आहेरकर, बालराजे आहेरकर, आदी उपस्थीत होते.

# गायरान जमीन वनविभागाच्या ताब्यात देण्यास कपिलधारवाडी ग्रामस्थांचा विरोध

## जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे मागणी



**बीड । प्रतिनिधी**

**तालुक्यातील पाली ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या कपीलधारवाडी येथील गायरान जमिनीची वनविभागाने पहाणी केली. ते गायरान ताब्यात घेण्याच्या तयारीत दिसत असल्याने यामुळे शेतकऱ्यांच्या जनावरांना चरण्यासाठी जागाच शिल्लक रहाणार नसल्याने यास विरोध करीत शेतकऱ्यांच्या हितासाठी गायरान जमीन वनविभागाच्या ताब्यात देऊ नये अशी मागणी कपीलधारवाडी ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी यांना निवेदनाद्वारे केली आहे.**

बीड तालुक्यातील पाली ग्रामपंचायत अंतर्गत येणारी ही वाडी असून, येथील जेमतेम ५०० लोकसंख्या आहे. सर्वांची उपजिविका ही शेती आणि दुग्ध व्यवसाय, शेळी, मेंडी पालन यावर अवलंबून आहे. येथील जवळपास सर्वच शेतकरी अल्पभूधारक असून ते अत्यंत दुर्गम भागात वास्तव्य करतात. अल्पभूधारक शेतकरी असल्यामुळे अनेकजण जोडधंदा म्हणून दुग्ध व्यवसाय, शेळी, मेंडी पालन करतात यामुळे अनेकांकडे दुभती जनावरे, शेळया, मेंढ्या आहेत. यांना चरण्यासाठी गायरान जमीन शिवाय दुसरा पर्याय नाही. परंतु यावर वनविभागाने डोळा लावला असून, ते हा गायरान ताब्यात घेणार असल्याच्या चर्चा सुरू आहे. जर हे गायरान वनविभागाच्या ताब्यात दिले तर आम्हाला जनावरे चारण्यासाठी जागा रहाणार नाही. त्यामुळे जनावरे विकण्याशिवाय पर्याय नाही. त्यामुळे आमच्यावर बेरोजगारीची कुऱ्हाड कोसळणार आहे. यामुळे जिल्हाधिकारी साहेब आपण याचा विचार करीत हा गायरान वनविभागाच्या ताब्यात देऊ नये अशी मागणी निवेदनाद्वारे केली आहे. याची प्रत तहसीलदार, वनविभाग, ग्रामपंचायत कार्यालयाला माहितीस्तव दिली आहे.

# धर्मापुरीत १३ लाख रुपयांचा गुटखा पकडला

## क्यू आर कोडवर आलेल्या माहितीवरून पोलिसांची कारवाई

बीड । प्रतिनिधी

बीडच्या परळी तालुक्यातील धर्मापुरी येथे परळी ग्रामीण पोलिसांनी तेरा लाख रुपयांचा गुटख्याचा साठा जप्त करण्याची कारवाई केली आहे. विशेष म्हणजे पोलीस दलाला क्यू आर कोडद्वारे गुटखा वाहतुकीची गुप्त माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी धर्मापुरी येथे मोठी कारवाई केली आहे. काही दिवसांपूर्वी बीड पोलीस दलाच्या वतीने संवाद प्रकल्प हाती घेण्यात आला होता. या अंतर्गत सर्वसामान्य नागरिक देखील अवैध धंदे तसेच एखाद्या गुन्ह्याच्या संदर्भात थेट पोलीस अधीक्षक कार्यालयाला माहिती देऊ शकतात. या ऑनलाइन तक्रारीचा किंवा कोड स्कॅन करून ही तक्रार तसेच माहिती देता येते. आलेल्या तक्रारीवर काय कार्यवाही झाली याबाबतची याबाबतचा पाठपूरावा पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून घेतला जातो; यावरूनच ही कारवाई करण्यात आली आहे.



### पोलिसात गुन्हा दाखल

बीड जिल्ह्यात गेल्या काही दिवसात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल अशा घटना घडत असताना आता पोलीस दलाकडून सुरू करण्यात आलेल्या या नाविन्यपूर्ण उपक्रमामुळे अवैध धंदे बंद करण्यात सर्वसामान्य नागरिकांची ही मदत होत असल्याचे दिसत आहे. याच संवाद प्रकल्प अंतर्गत धर्मापुरी येथे गुटख्याचा साठा असल्याची माहिती समोर आली होती. त्यानुसार पोलिसांनी ही कारवाई केली असून या प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आला.

### १३ लाखांचा गुटखा जप्त

बंदी असलेला गुटखा, तंबाखूची तस्करी आजही मोठ्या प्रमाणात सुरु आहे. कारवाई होत असताना देखील छुप्या पद्धतीने गुटखा वाहतूक व विक्री केली जात आहे. अशाच प्रकारे बीड जिल्ह्यात गुटखा वाहतुकीवर मोठी कारवाई करण्यात आली आहे. यात तब्बल १३ लाख रुपयांचा गुटख्यासह पोलिसांनी मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी पोलिसांकडून तपास सुरु आहे.

# वैयक्तिक लाभाच्या योजनेकरिता ग्राम सभेच्या ठरावाचा निकष रद्द करा - वंचित बहुजन आघाडी




बीड । प्रतिनिधी

विशेष घटक योजना, ओटीएसपी, रमाई घरकूल योजना या योजना अनु.जाती व जमातीच्या लाभार्थ्यांना अर्थ सहाय्य देवून त्यांची उन्नती करण्यासाठी शासनामार्फत विविध योजना राबविण्यात येतात. सदरील योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज सादर करतांना ग्रामसभेचा ठराव जोडावा असे नमूद केले जाते.

ग्रामसभेचा ठराव अर्ज भरण्यासाठी अनिवार्य असल्यामुळे अनेक लाभार्थी अर्ज भरण्यापासून वंचित राहतात. गावपातळीवरील राजकीय हेवेदावे तसेच जातीय समीकरण यातून निर्माण झालेले विविध समूहाचे गट यामुळे अनू. जाती व जमातीच्या लाभार्थ्यांना ग्रामसभेचा ठराव मिळविणे जिकरीचे जाते. भारतीय समाज हा जातीय व्यवस्थक असल्यामुळे गावातील राजकारणामध्ये अनु.जाती व जमातीच्या समूहाला दुय्यम वागणूक देण्यात येते. कोणत्याही योजनेचा लाभ देण्यासाठी गावातील पुढारपण करणारे नेतृत्व मी तुम्हाला लाभ मिळवून देतो अशी उपकाराची व वर्चस्वाची भावना ठेवतो. त्यामुळे या समूहाला अंकित ठेवण्यासाठी गावपातळीवर ग्रामसभेच्या ठरावाचा हत्यार म्हणून वापर केला जातो हे सर्व ज्ञात आहे. त्यामुळे विघयो, ओटीएसपी, रमाई

◀◀ पान ३ वर

# देवडी येथे बांधकाम कामगारांचे आरोग्य शिबिर

**वडवणी । प्रतिनिधी**

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची तपासणी ते उपचार आरोग्य योजनेंतर्गत नोंदणीकृत बांधकाम कामगार व त्यांच्या कुटुंबातील आई वडील व त्यांचे दोन मुल यांची आरोग्य तपासणी करण्यात येत.



या योजनेंतर्गत देवडी येथे लाल बावटा बांधकाम कामगार संघटनेचे जिल्हाउपध्यक्ष कॉ.ओम पुरी यांच्या पुढाकाराने हे आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते.या शिबीरात कॉ.ओम पुरी यांनी या योजनेची सविस्तर माहिती दिली हि योजना कार्यान्वित करण्यासाठी लाल बावटा बांधकाम फेडरेशन ने आंदोलन केले या योजनेत सुरूवातीला फक्त तपासणी होती तेही बांधकाम कामगाराची पण उपचार नव्हता.

फेडरेशन ने आंदोलन व पाठपुरावा केल्यानंतर या योजनेत मोफत वैद्यकीय उपचार व आई वडीलांचा व दोन मुलांचा सामावेश करण्यात आला. व बांधकाम कामगारांची व कुटुंबातील सदस्याची आरोग्य तपासणी केल्यानंतर त्यांना उपचारासाठी जिल्ह्यातील सुसज्ज व सोयी सुविधा उपलब्ध असलेल्या दावाखान्यात बांधकाम कामगारांचा उपचार मोफत व्हावा यासाठी जिल्ह्यातील काही दावाखान्या सोबत मंडळाने करार केलेला आहे यात १) दिप हॉस्पिटल बीड, २) लाईफ लाईन हॉस्पिटल बीड,३) यशवंतराव जाधव मेमोरियल हॉस्पिटल बीड,४)

# सांगली जिल्ह्यातील ४ वर्षाच्या चिमुरडीवर अत्याचार करुन खून करणाऱ्या नराधमाला तात्काळ फाशी द्या

**माजलगाव । प्रतिनिधी**

सांगली जिल्ह्यातील जत येथील ''करगणी'' गावातील ४ वर्षाच्या चिमुरडीवर अत्याचार करुन खुन करणाऱ्या आरोपीला १५ दिवसांत दोषारोपपत्र सादर करुन फास्टट्रॅक कोर्टात खटला चालवुन आरोपीला तात्काळ फाशी देण्यात यावी अशी मागणी माजलगाव तहसीलदारांना मुस्लिम समाजाच्या वतीने निवेदनाद्वारे देण्यात आले.



**माजलगाव तहसीलदारांना मुस्लिम समाजाच्या वतीने निवेदन**

यासंदर्भात मुस्लिम समाजाच्या वतीने दि १३ फेब्रुवारी गुरुवार रोजी माजलगाव तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की,सांगली जिल्ह्यातील जत येथील ''करगणी'' या छोट्याश्या गावी ४ वर्षाच्या चिमुरडीचा अत्याचार करून तिचे तुकडे करून खून करण्यात आला आहे.

वय वर्ष ४ असलेल्या मुलीला काय समज असणार ?? अंगणात खेळत असणाऱ्या नराधमाने तिला फूस लावली. मुलीची आई डिलिव्हरीसाठी दुसऱ्या गावात गेली होती घरात फक्त तिची आज्जी होती. नात बाहेर खेळत असेल म्हणून ती आत काम करत होती.परंतु बाहेर असणाऱ्या नराधमांने ''डाव'' साधला.आमिष दाखवत एका पत्र्याच्या खोलीत नेऊन त्याने चिमुकलीवर

# धनराज गौतमचंदजी सोळंकी यांची भारतीय जैन संघटना मराठवाडा विभाग अध्यक्षपदी नियुक्ती

अंबाजोगाई । प्रतिनिधी

जालना येथे श्री गुरु गणेश धाम येथे संपन्न झालेल्या एका कार्यक्रमात मराठवाडा विभागासाठी अध्यक्ष, सचिव व इतर पदांसाठी पदग्रहण समारंभ झाला त्यात अंबाजोगाई चे उद्योजक धनराज सोळंकी यांची मराठवाडा विभाग अध्यक्ष या पदासाठी नियुक्ती करण्यात आली तसेच प्रादेशिक मीडिया व सोशल मीडियापदी निलेश मुथा यांची नियुक्ती झाली. तसेच वेगवेगळ्या प्रादेशिक प्रमुख पदी आनंद कर्नावट, अधिकार मर्लेचा , वर्धमान ढोले इतर सर्व राज्य कार्यकारिणी पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करून



शपथविधीचा कार्यक्रम गुरू गणेश संकुल,जालना येथे संपन्न झाला.सर्व कार्यक्रम राष्ट्रीय अध्यक्ष नंदकुमार सांखलाजी,राष्ट्रीय महामंत्री दीपक चोपडाजी,राज्यअध्यक्ष केतनभाई शहा, राज्य महासचिव प्रवीणजी पारख यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. अंबाजोगाई शहरात या सर्व निर्वाचित पदाधिकाऱ्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# शिवजयंती निमित्ताने महिला मराठा क्रांती ग्रुप चे पुरस्कार जाहीर

## शिवमती सीताबाई जाधव ,निलावती गायकवाड ,अप्रूगा जाधव पुरस्काराच्या मानकरी

**बीड । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती निमित्त दरवर्षी कर्तृत्ववान महिलांना जिजाऊ रत्न पुरस्कार दिले जातात. हे पुरस्कार महिला मराठा क्रांती ग्रुप च्या वतीने राज्यस्तरावर दिले जातात. यावर्षी या पुरस्कारासाठी बीडच्या तीन महिलांचा समावेश करण्यात आला आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती निमित्ताने महिला मराठा क्रांती ग्रुप च्या वतीने राज्यस्तरावर कर्तृत्ववान महिलांना पुरस्कार दिले जातात .त्यांच्या कार्याचा पुरस्कार देऊन गौरव केला जातो.



दरवर्षीप्रमाणे याही वर्षी शिवजयंतीच्या निमित्ताने बीड येथील शिवमती सीताबाई बलभीमराव जाधव, शिवमती निलावती मच्छिंद्र गायकवाड, शिवमती अप्रुगा उत्तरेश्वर जाधव या तीन महिलांना हे पुरस्कार देण्यात येणार असून या कर्तृत्वावर महिलांचे महिला मराठा क्रांती ग्रुप च्या वतीने अभिनंदन करण्यात आले आहे. शिवजयंतीच्या निमित्ताने या पुरस्काराचे वितरण दिनांक २० फेब्रुवारी रोजी सकाळी १०.२५ वाजता शांतिनिकेतन इंग्लिश स्कूल पांगरी रोड बीड येथे मनोज दादा जरांगे पाटील यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून नारायण गडाचे महंत शिवाजी महाराज उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून शिवमती कुंदाताई काळे तर प्रमुख पाहुणे म्हणून शिवमती रत्नमालाताई धांडे उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन महिला मराठा क्रांती ग्रुपच्या वतीने करण्यात आले आहे.

# आष्टीत बारावी परिक्षेत कॉप्यांचा सुळसुळाट

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील कडा येथे असणारे आनंद राव धोंडे, श्रीराम धोंडे सह मोतीलाल कोठारी विद्यालय ये सुरू असलेल्या बारावी परीक्षेत जणु विना रुताच पाऊस पडतं असल्याचे निदर्शनास येत आहे व पत्रकार बांधवानी विचार पुस केली असता त्यांना अरे तुरे भाषा वापरुन शिवीगाळ केल्याची घटना या परिक्षा केंद्र अतंर्गत घडतं असल्याचा प्रकार उघडकीस होतं आहे तरी या आजी माजी आमदाराच्या विद्यालयावर कुणाचे नियंत्रण आहे का...? किंवा पदाधिकारी यांना घाबरतात का ..?असा सवाल जनतेतुन उपस्थित होतं आहे.




पाटोदा : तालुक्यातील मौजे थेरला येथे अखंड हरिनाम सप्ताहात दि. १२ फेब्रुवारी २०२५ रोजी भगवानगडाचे मठाधिपती महंत न्या.नामदेव महाराज शास्त्री यांच्या हस्ते वंजारी समाज सहाव्या वार्षिक अंकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी का. संपादक डॉ. संजय तांदळे, बाजीराव ढाकणे, संतोष गर्जे ,लक्ष्मण चाटे आदी दिसत आहेत.

# कॉपीमुक्त वातावरणात वडवणी तालुक्यात बारावीच्या परिक्षा सुरळीत सुरु

## ● नियमांचे उल्लंघन केल्यास कठोर कारवाई होणार –गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे

वडवणी । प्रतिनिधी

मंगळवार दिनांक ११ फेब्रुवारी रोजीपासून बारावी बोर्डाच्या परिक्षा सुरु झालेल्या आहेत. या बारावीच्या परिक्षेत वडवणी तालुक्यातील कला, विज्ञान, वाणिज्य, व एमसीव्हीसी या चार शाखेतील जवळपास ३ हजार १९६ विद्यार्थी हे परिक्षा देत असून काल गुरुवार रोजीपर्यंत बारावीचे तीन विषयांचे पेपर संपले आहेत. वडवणी परिरक्षक केंद्राअंतर्गत असलेल्या सर्व आठ परिक्षा केंद्रांवर कॉपीमुक्त वातावरणामध्ये परिक्षा सुरळीतपणे सुरु असून या परिक्षांमध्ये कॉपीमुक्तीची काटेकोरपणे अंमलबजावणी केली जात आहे. जर कोणीही या नियमांचे उल्लंघन केले तर त्यावर कठोर कारवाई करण्यात येईल असा सज्जड इशाराही वडवणी तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी तथा परिरक्षक केंद्राचे प्रमुख बाबासाहेब उजगरे यांनी दिला आहे.



वडवणी येथील महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय याठिकाणी असलेल्या सी.यू.१३५ केंद्राअंतर्गत वडवणी, धारुर व बीड या तालुक्यांमधील एकूण ८ परिक्षा केंद्र येतात. या सर्व परिक्षा केंद्रांमध्ये कॉपीमुक्त परिक्षा पॅटर्न अंतर्गत बारावी बोर्डाच्या परिक्षा सुरळीतपणे सुरु असून यामध्ये नविन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय लिंबा रुई याठिकाणी ४८८, सिध्दीविनायक महाविद्यालय पिंपळनेर याठिकाणी ३३०, महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय वडवणी याठिकाणी ३७२, लोकमान्य टिळक महाविद्यालय वडवणी या ठिकाणी ३४९, छत्रपती राजश्री शाहू महाराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय वडवणी याठिकाणी २२८, सरस्वती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय तेलगांव याठिकाणी ५९४, अशोक माध्यमिक व उच्च माध्यमिक

◀◀ पान ३ वर

# आरोग्य विभागाच्या रुग्णवाहिकांनी मांडला रुग्णांच्या आयुष्याचा खेळ

**बीड । प्रतिनिधी**

आरोग्य विभागाने रुग्णांचा जीव वाचवा त्यांना तात्काळ आरोग्य सुविधा मिळाव्यात या दृष्टिकोनातून करोडो रुपये खर्च करून सुरू केलेली १०८ रुग्णवाहिकेची आरोग्य सेवा ही नेमकी कशासाठी केली याचा प्रश्न सर्वसामान्य जनतेला पडला असून या खाजगी यंत्रणेवर कोणाचे नियंत्रण नाही का असा सवाल जनतेला पडला आहे. याचा प्रत्यक्ष अनुभव दि:७/२/२५ रोजी केज तालुक्यातील सांगावी पटीजवळ झालेल्या अपघातात पाहायला मिळाला त्या अपघातात जखमी झालेल्या रुग्णांना केज उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते .त्या पैकी एक रुग्ण केज उपजिल्हा रुग्णालयात मयत झाला व उर्वरित ०४ रूग्णांना केज उपजिल्हा रुग्णालयात अस्तिरोग तज्ञ उपलब्ध नसल्यामुळे त्यांना पुढील उपचारांसाठी स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय आंबेजोगाई येथे घेऊन जाण्याचा सूचना वैद्यकीय अधिकारी केज यांनी केल्या होत्या .त्यामुळे रुग्णांना पुढील उपचार करण्यासाठी रुग्णवाहिकेची आवश्यकता होती त्यासाठी रुग्णांच्या नातेवाईकांनी १०८ रुग्णवाहिकेला




कॉल केला पण रुग्णवाहिका लवकर न आल्यामुळे एक रुग्ण गंभीर जखमी असल्यामुळे खाजगी रुग्णवाहिकेने वैद्यकीय महाविद्यालय आंबेजोगाई येथे पाठवण्यात आला. परंतु तो पण रुग्ण रस्त्यातच मयत झाला. उर्वरित राहिलेले चार रुग्ण एक तासापासून उपजिल्हा रुग्णालय केज येथे रुग्णवाहिकेची वाट पाहत बसले होते .त्यानंतर नातेवाईकांनी परत एकदा १०८ ला कॉल केल्यानंतर कॉल सेंटर वरून तुम्हाला धारूर ग्रामीण रुग्णालयातून १०८ रुग्णवाहिका येत आहे असे सांगण्यात आले .परंतु संबंधित नातेवाईकांनी केज उपजिल्हा रुग्णालय या ठिकाणी १०८ ची रुग्णवाहिका सकाळी सात वाजल्यापासून उभी आहे असे सांगितले .त्यानंतर त्यांनी परत १०८ कॉल सेंटरला फोन केला परंतु रुग्णवाहिका उभी असताना सुद्धा ती रुग्ण घेऊन जात आहे , कॉलवर आहे असे केज उपजिल्हा रुग्णालयात उभी असलेली १०८ ची रुग्णवाहिका दाखवत होती. त्यानंतर रुग्णांच्या नातेवाईकांनी वैद्यकीय अधीक्षक डॉक्टर केंद्रे यांना संपर्क केला त्यांनी पण १०८ ची रुग्णवाहिका रुग्णांना घेऊन जाण्यासाठी येईल असे सांगितले परंतु केज उपजिल्हा रुग्णालयाच्या परिसरात उभ्या असलेल्या रुग्णवाहिकेने रुग्णांना एक तास रुग्णालयात ताटकळत ठेवले या

◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# ५१ घरफोड्या करणारा अट्टल गुन्हेगार जेरबंद

**पुणे । प्रतिनिधी**

शिवाजीनगर पोलिसांनी ५१ घरफोड्या करणाऱ्या अट्टल गुन्हेगारास जेरबंद केले. त्याच्याकडून १७ लाख ७ हजार रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिने हस्तगत करण्यात आले. हा गुन्हेगार गुन्हा करताना आणि निघुन जाताना वेश बदलण्यास पटाईत होता. तसेच पोलिसांना गुंगारा देण्यासाठी तो मुद्दामहुन सीसीटीव्हीखाली बंद मोबाईलवर बोलण्याचा बहाणा करायचा. हर्षद गुलाब पवार ( ३१, रा. गुलाबनगर, घोटावडे फाटा, मुळशी) असे अटक आरोपीचे नाव आहे.




याप्रकरणी माहिती देताना पोलीस उपायुक्त संदिपसिंग गिल यांनी सांगितले की, पोलीस हवालदार सचिन जाधव यांना खबर मिळाली की, घरफोडीच्या गुन्हयातील आरोपी म्हसोबा गेट बस स्थानकापाशी येणार आहे. त्यानूसार त्यास सापळा रचून पकडण्यात आले. त्याच्याकडे केलेल्या चौकशीत त्याने पुणे शहर व पिंपरी चिंचवड आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये तब्बल घरफोड्या केल्याची कबुली दिली. तो २०२३ मध्ये जामिनावर सुटला असून त्याच्यावर ५१ पेक्षा अधिक घरफोडीचे गुन्हे दाखल आहेत.

पोलीस सीसीटीव्ही तपासून आपला माग काढू नये म्हणून हर्षद घरफोडी करण्याच्या ठिकाणी येताना ४० ते ५० किलोमीटरचा प्रवास करायचा तसेच जातानाही ४० ते ५० किलोमीटरचा प्रवास करायचा. अनेकदा तो स्वत:च्या घरी न जाता एखाद्या सोसायटीच्या पार्किंगमध्ये झोपायचा. तो शनिवार आणि रविवारी मात्र घरफोडी करायचा नाही. या दिवशी नोकरदार वर्ग घरी असल्याचे रिस्क नको म्हणून तो चोरी करणे टाळायचा. तसेच स्वत:ची ओळख लपविण्यासाठी वेगवेगळी जॅकेटस, टोपी परिधार करायचा.चुकून सीसीटीव्हीमध्ये छबी आलीच तर पोलिसांचा तांत्रीक तपास भरकटावा यासाठी मोबाईल कानाला लावून बोलण्याची क्टींग करायचा. प्रत्यक्षात मात्र त्याचा मोबाईल बंद असायचा. यामुळे मोबाईलचा डंम्प डाटा काढल्यावर त्याचा नंबर शोधणे पोलिसांना मुश्किल असायचे. चोरलेले दागिने विकण्यासाठी त्याने निलकंठ राऊत या सहकाऱ्याची मदत घेतली होती.

ही कारवाई सहायक पोलीस आयुक्त, साईनाथ ठोंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक चंद्रशेखर सावंत, पोलीस निरीक्षक चंद्रकांत सुर्यवंशी, सहायक पोलीस निरीक्षक संजय पांढरे, राजकुमार केंद्रे , उपनिरीक्षक अजित बडे, पोलीस हवालदार रुपेश वाघमारे, भाऊ चव्हाण, प्रमोद मोहिते, राजकिरण पवार, महावीर वलटे, अंमलदार सचिन जाधव, प्रविण दडस, सुदाम तायडे, कृष्णा सांगवे, तेजस चोपडे, आदेश चलवादी यांच्या पथकाने केली.

# पीओपीच्या मूर्ती बनविण्यावर बंदीच; महापालिकेने केली सुधारित नियमावली जाहीर

**पुणे । प्रतिनिधी**

प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती बनविण्यावर उच्च न्यायालयाने बंदी घातली आहे. त्यानुसार महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी सुधारित नियमावली जाहीर केली आहे. त्यामध्ये पीओपीची मूर्ती बनविणे किंवा विसर्जन करण्यावर बंदी घालण्यात आली आहे.



या नियमाचे उल्लंघन केल्यास पर्यावरण अधिनियमातील तरतुदीनुसार कारवाई केली जाणार आहे. त्यामुळे पुढील वर्षाच्या मूर्तीकारांना आता शाडू मातीच्या मूर्ती बनवाव्या लागणार आहेत.गणेशोत्सवामध्ये घरोघरी गणेश मूर्तीची प्रतिष्ठापना केली जाते. यासाठी लाखो मूर्त्या बाजारात विक्रीसाठी आणलेल्या असतात. मूर्तीकारांकडून पीओपीच्या मूर्ती बनविण्यावरच भर दिला जातो. पण पीओपीच्या मूर्ती पाण्यात विरघळत नाहीत, त्यावर रसायनमिश्रीत रंग दिल्याने पाणी प्रदूषण होते. याकारणामुळे पीओपीच्या मूर्ती बनविणे आणि विसर्जित करण्यासंदर्भात उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात आलेली होती.

केंद्रीय पर्यावरण व वातावरणीय बदल विभागातर्फे केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने मे २०२० मध्ये मूर्ती विसर्जनाबाबत मार्गदर्शक तत्त्वे प्रसिद्ध केले होते. त्यास अनुसरून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने नियमावली जाहीर केली होती. यासंदर्भात उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल झाली होती. या याचिकेच्या ३० जानेवारी रोजी झालेल्या सुनावणीत विविध सण-उत्सावादरम्यान सर्व महापालिका, सर्व जिल्हाधिकारी यांनी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सुधारित मार्गदर्शक तत्वांतील कलम २ नुसार प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती बनविणे अथवा विसर्जित करणे यावर पूर्णपणे बंदीच्या आदेशाचे काटेकोरपणे पालन करण्याचे निर्देश न्यायालयाने दिले आहेत. त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचे आदेश अतिरिक्त पृथ्वीराज बी.पी यांनी काढले आहेत. आगामी काळात होणारे सर्व सण-उत्सवांत या निर्देशांचे उल्लंघन झाल्यास पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६ अन्वये, संबंधितांवर कारवाई केली जाणार आहे, असे पृथ्वीराज बी.पी. यांनी स्पष्ट केले आहे.

# लाच घेणं भोवलं! लिपिक महिलेसह दोघे एसीबीच्या जाळ्यात

**पुणे । प्रतिनिधी**

टेमघर प्रकल्पबाधितांचा प्रस्ताव मंजूर करण्यासाठी एक लाख ६० हजार रुपयांची लाच घेणार्या शिरूर उपविभागीय कार्यालयातील लिपिक महिलेसह दोघांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) पकडले.



यापकरणी शिरूर उपविभागीय कार्यालयातील लिपिक सुजाता, तानाजी मारणे (वय ४६) यांच्याविरुद्ध बंडगार्डन पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत एकाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दिली होती.

तक्रारदारांची जमीन टेमघर प्रकल्पासाठी राज्य शासनाने संपादित केली होती. शासनाकडून त्यांना शिरूर तालुक्यातील विठ्ठलवाडीत जागा देण्यात येणार होती. शेतजमीन आणि घरासाठी दोन गुंठ्यांचा भूखंड शासनाकडून त्यांना मंजूर झाला होता. तक्रारदार आणि त्यांच्या भावाच्या कुटुंबातील आठ सदस्यांचे प्रस्ताव शिरूर उपविभागीय कार्यालयातील लिपिक सुजाता यांच्याकडे प्रलंबित होते.

शिरूर उपविभागीय कार्यालयातील अधिकार्यांसमोर संबंधित प्रस्ताव मंजुरीसाठी प्रत्येक प्रस्तावापोटी ५० हजार रुपयांची लाच तक्रारदाराकडे मागितली होती. सुजाता यांनी त्यांच्याकडे एकूण मिळून चार लाख रुपयांची लाच मागितली होती. त्यानंतर तडजोडीत प्रत्येक प्रस्ताव मंजूर करण्यासाठी ४० हजारांची लाच मागितली होती. आठ प्रस्ताव मंजुरीसाठी तीन लाख २० हजार रुपये देण्याची मागणी करण्यात आली.

लाचेच्या पहिला हप्त्यापोटी एक लाख ६० हजार रुपयांची लाच घेऊन तक्रारदाराला शिरूर उपविभागीय कार्यालयात बोलाविण्यात आले. सुजाता यांच्या सांगण्यावरून ही रक्कम खासगी व्यक्ती तानाजी मारणे याच्याकडे दिली.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने मारणेला लाच स्वीकारताना पकडले. चौकशीत सुजाता यांच्या सांगण्यावरून लाच घेतल्याचे उघड झाल्यानंतर लिपिक महिलेसह दोघांविरुद्ध रात्री उशिरा बंडगार्डन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून त्यांना ताब्यात घेण्यात आले. पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अतिरिक्त अधीक्षक डॉ. शीतल जानवे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. पोलीस निरीक्षक अमोल भोसले तपास करत आहेत.

# कारवाईनंतर अतिक्रमण जैसे थे; देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्ड परिसरातील स्थिती

**देहूगाव । प्रतिनिधी**

देहूरोड मेनबाजार पेठेतील भाजी मंडईलगत रस्त्यावरच पथारीवाले, हातगाड्यांचे अतिक्रमण होत असल्याने वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस गंभीर बनत चालली आहे. त्यामुळे पादचारी, वाहनचालक यांना प्रवास करणे कठीण होत आहे. त्यामुळे संबंधित अतिक्रमणधारकांवर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.



कॅन्टोमेंट बोर्डाच्या अतिक्रमण विरोधी कारवाईचा प्रश्न वारंवार ऐरणीवर येत आहे. रस्त्यावरच बेशिस्तपणे भाजीपाला विक्रीच्या लागणार्या हातगाड्या, दुकानांच्या समोरील रस्त्यावर झेलेले अतिक्रमण याविषयी भाजी मंडईतील गाळेधरकांनी कॅन्टोन्मेंट बोर्ड प्रशासनाकडे तक्रारी केल्या होत्या. परंतु, त्याकडे बोर्डाचे अधिकारी दुर्लक्ष करीत असल्याने भाजी मंडईतील गाळेधारक संतप्त झाले आहेत. बोर्डाकडून अतिक्रमण विरोधी केलेली कारवाई म्हणजे दिखावा असल्याची प्रतिक्रिया गाळेधारक व्यक्त करू लागले आहेत. देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या हद्दीमध्ये स्वतंत्र भाजी मंडई असूनही उड्डाणपूल, मेन बाजारपेठ, आबूबकरशेठ रोडवर रस्त्याच्या दुतर्फा पथारीवाल्यांसह हातगाड्याचे अतिक्रमण होत आहे. परिणामी वाहतूक कोंडीची ही बाब नित्याचीच झाली आहे. याचा नाहक त्रास पादचरी, वाहनचालक यांना सहन करावा लागत आहे. शिवाय यापैकी काही हातगाडीवरून भाजीपाला करणार्या विक्रेत्यांबाबत कॅन्टोन्मेंट बोर्डाकडे काहीच माहिती नाही. हातगाड्या व पथारीवाले दररोज रात्री हातगाड्या बंद केल्यानंतर भाजीपाल्याचा कचरा रस्त्यावरच टाकून देतात. त्यामुळे डासांचा प्रादुर्भाव वाढत असून आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. दररोज सकाळी आणि संध्याकाळी रस्त्यावर कचरा पडलेला दिसत आहे. त्यामुळे संबंधित विक्रेत्यांवर कारवाई करण्याची मागणी परिसरातील नागरिकांकडून केली जात आहे.

# मनसेच्या विरोधामुळे भाडिपाच्या 'निर्ल्लज कांदेपोहे'चा पुण्यातील शो रद्द

**पुणे । प्रतिनिधी**

रणवीर अलाहाबादियाच्या वादग्रस्त वक्तव्यावरुन मोठा वाद निर्माण झाला आहे. त्याचे पडसाद संसदेतही उमटले आहेत. इंडियाज गॉट लेटेन्ट या शोमध्ये त्याने केलेल्या वक्तव्यामुळे चर्चेला उधाण आले. त्यानंतर भाडिपाच्या 'अतिशय निर्ल्लज कांदेपोहे' या एपिसोडचे प्रसारण पुढे ढकलण्यात आले आहे. या एपिसोडमध्ये भाग्यश्री लिमयेसोबत भाग घेतला होता, पण आता सई ताम्हणकरसोबत होणारा भाग भाडिपा पुढे ढकलणार आहे. याशिवाय, या शोसाठी ज्यांनी तिकिटं बुक केली होती, त्यांना पैसे परत दिले जाणार आहेत. दरम्यान भाडिपा आणि सारंग साठ्ये मनसेच्या रडारवरती आले आहेत, या सर्व वादादरम्यान आणि शो रद्द केल्यानंतर सारंगने पहिली प्रतिक्रिया दिली आहे.




सध्या यावर आम्हाला काही बोलायचं नाही आहे. आम्हालाच माहिती नाही हे कशामुळे सुरु झाले आहे. आम्ही सर्व गोष्टी समजून घेत आहोत. त्यामुळे आता बोलणे म्हणजे आगीत तेल टाकण्यासारखं आहे, सध्या उद्याचाच शो रद्द करण्याचे ठरवलं आहे, अशी प्रतिक्रिया सारंग साठ्येने दिली आहे. रणवीर अलाहाबादीयाच्या प्रकारानंतर सर्वत्र वातावरण तापल्याचं दिसून येत आहे. आता सारंग साठ्येच्या अतिशय निर्लज्ज शो मनसेकडून बंद पाडण्याचा इशारा देण्यात आला आहे. मनसे चित्रपट सेनेच्या निशाण्यावर सारंग साठ्येचा अतिशय निर्लज्ज शो आला आहे. सारंग साठ्ये विरोधात मनसे चित्रपट सेना आक्रमक झाली आहे. मनसे स्टाईल पुण्यातील शो बंद पडणार असल्याचा मनसे चित्रपट सेनेचे पुणे अध्यक्ष चेतन धोत्रेनी सोशल मिडियावरती पोस्ट लिहून इशारा दिला आहे. त्याचबरोबर आपल्या फेसबुक पोस्टमधून मनसे चित्रपट सेनेने सारंग साठ्येला विरोध दर्शवला आहे.

# धनादेश अनादरप्रकरणी साध्या कारावासाची शिक्षा

**पुणे । प्रतिनिधी**

धनादेश अनादरप्रकरणी (बाउन्स) उद्धव अनसा लंघे याला तीन महिने साधा कारावास आणि पाच लाख रुपये नुकसान भरपाई देण्याचा आदेश घोडेगाव (ता. आंबेगाव) येथील दुसरे सहदिवाणी व फौजदारी न्यायाधीश एम. एस. माळी यांनी दिला. भीमाशंकर चीटूस इंडिया प्रायव्हेट लिमिटेड कंपनीने दावा दाखल केला होता.

संविदणे (ता. शिरूर) येथील उद्धव लंघे यांनी भीमाशंकर चीटूस इंडिया प्रायव्हेट लिमिटेड कंपनीकडून तीन लाख रुपये रक्कम उचलली होती. सदर रक्कम ठरलेल्या वेळेत प्रत्येक हप्त्यात भरण्याची हमी दिली होती. रक्कमेची परतफेड करण्यासाठी लंघे याने तीन लाख ५० हजार रुपये रक्कमेचा धनादेश दिला. सदर धनादेश बँकेत वटविण्यासाठी देण्यात आला. परंतु, तो अनादर झाला. वेळोवेळी संस्थेने त्यांना नोटीस पाठवून रक्कम देण्याची मागणी केली. परंतु त्यांनी रक्कम दिली नाही. त्यामुळे कंपनीने घोडेगाव न्यायालयात चलनक्षम दस्तऐवज कायदा कलम १३८ अन्वये खटला दाखल केला होता.

घोडेगाव न्यायालयाचे दुसरे सहदिवाणी व फौजदारी न्यायदंडाधिकारी एम. एस. माळी यांच्या न्यायालयात सुनावणी झाली. दोन्ही पक्षाचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने लंघे यांना दोषी ठरवत तीन महिने कारावास आणि पाच लाख रुपये देण्याचे आदेश पारित केला. या प्रकरणी फिर्यादी कंपनीतर्फे ड. बाळासाहेब पोखरकर, ड. प्रतिक गोडसे व ड. प्रतिक्षा काळे यांनी कामकाज पाहिले.

# डिझेल चोरी करणारी टोळी गजाआड; १५ लाख २५ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त

**बेल्हे । प्रतिनिधी**

राष्ट्रीय महामार्गालगत उभ्या असणार्या वाहनांमधील डिझेल चोरी करणाऱ्या परप्रांतीय टोळीच्या आळेफाटा पोलिसांनी मुसक्या आवळल्या. त्यांच्याकडून १५ लाख २५ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.



याबाबत आळेफाटा पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, राजेशकुमार परमार (वय ४८) हे ट्रक आळे (ता. जुन्नर) गावचे हद्दीत महालक्ष्मी फर्निचरसमोर उभा करून झोपले होते. त्या वेळी अज्ञातांनी त्या ट्रकमधून २०० लिटर डिझेल चोरून नेले होते.

याबाबत फिर्याद दिल्यानंतर पोलिस निरीक्षक दिनेश तायडे यांनी तपास करण्याचे आदेश दिले. पोलिसांना गोपनीय बातमीदारामार्फत तसेच तांत्रिक विश्लेषणाद्वारे माहिती मिळाली की, अशाप्रकारे डिझेल चोरी करणारे संशयित हे एका ट्रक मधून डिझेल चोरी करण्यासाठी पुणे-नाशिक महामार्गाने येणार आहेत.

पोलिसांनी त्वरित आळेफाटा चौक येथे नाकाबंदी नेमून हा ट्रक आल्यानंतर राजाराम परमार (वय ४८) फिरोज खान (वय २८), कल्लू खाँ रूस्तम खाँ मन्सुरी (वय ३८), विनोद सिंग (वय २८) आणि ओमप्रकाश बैरागी (वय ४४) यांना ट्रकसह ताब्यात घेतले. चौकशी केली असता त्यांनीच डिझेल चोरी केल्याचे कबूल केले. या पाच जणांकडून त्यांनी गुन्हा करतेवेळी वापरलेला ट्रक व चोरून नेलेले डिझेल विक्री करून आलेले पैसे असा एकूण १५ लाख २५ हजार ५०० रुपयांचा माल जप्त केला.

# चिंचवडमधील जिजाऊ पर्यटन केंद्राची दुरावस्था

**पिंपरी । प्रतिनिधी**

चिंचवडगाव येथील महापालिकेच्या जिजाऊ पर्यटन केंद्राची दुरवस्था झाली असून खेळणी तुटली असून पथदिव्यांचे झाकणे गायब आहेत. स्वच्छतागृहाची नियमित साफसफाई होत नसल्याने दुर्गंधी पसरली आहे. महापालिका उद्यान विभागाने तातडीने याची दखल घेऊन योग्य उपाययोजना कराव्यात. अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

महापालिकेच्या वतीने ३ जानेवारी २०१७ रोजी माजी उपमुख्यमंत्री अजित पवार व पालकमंत्री गिरीष बापट यांच्या हस्ते या पर्यटन केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. या पर्यटन केंद्रात फायबरचा वापर करुन विविध प्राण्यांच्या प्रतिकृती साकारण्यात आल्या आहेत. तसेच ओपन जिमही उभारण्यात आली आहे. मात्र, सध्या या प्राण्यांची अवस्था खराब झाली असून अनेक प्राणी तुटले आहेत, त्यांचा रंगही पुसट झाला आहे. या उद्यानात लहान मुलांची मोठ्या संख्या असते. मात्र, दिव्यांचे झाकणे गायब झाली असल्याने अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. फरशाही निखळल्या आहेत. या पर्यटन केंद्रात मुलांसाठी खेळणी असून अनेक खेळणी तुटलेली आहेत. त्यावर काही लहान मुले खेळत असतात, त्यामुळे मुलांना इजा होण्याची शक्यता नाकारता येत नाही. फिरणारे बदक तुटले असून घसरगुंडीला चिरा पडल्या आहेत. घसरगुडींच्या पायऱ्या, बाकडी मोडकळीस आलेले आहेत. कलाकार व्यासपीठाचे पाइप तुटले असून या व्यासपीठाला अवकळा आली आहे. महापालिका या पर्यटन केंद्रासाठी कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारत नाही, तसेच शजारीच श्रीमंत मोरया गोसावी मंदिर असल्याने दररोज मोठ्या प्रमाणात गर्दी या उद्यानात असते. तसेच खुली व्यायामशाळा असल्याने आबालवृद्ध मोठ्या संख्यने येत असतात. मात्र, महापालिका उद्यान विभागाने या उद्यानाकडे पूर्णपणे दुर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे.

# नाथ साहेबांचं चांगभलं! श्रीनाथ म्हस्कोबाचा जोगेश्वरी देवीचा शाही विवाह उत्साहात

**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्रीक्षेत्र वीर (ता. पुरंदर) नगरीतील श्रीनाथ म्हस्कोबा व माता जोगेश्वरी यांची यात्रा लग्नसोहळ्याने सुरू झाली. 'सवाई सर्जाचं चांगभलं... नाथ साहेबांचं चांगभलं' असा जयघोष करत भाविकांनी लग्नसोहळ्याला उपस्थित राहून देवाचे दर्शन घेतले.

मंगळवारी (दि. ११) पहाटे ५ वाजता पूजा होऊन मुख्य गाभारा बंद करण्यात आला. सकाळी ६ वाजता मुख्य गाभारा दर्शनासाठी खुला करण्यात आला व सकाळी देवाला अभिषेक करण्यात आला. साडेदहा वाजता देवाला दहीभाताची पूजा बांधण्यात आली.

दुपारी १२ वाजता धुपारती होऊन मुख्य गाभारा बंद करण्यात आला. सव्वाएक वाजता मुख्य गाभारा दर्शनासाठी खुला करण्यात आला. देवाच्या लग्नसोहळ्यानिमित्त मंदिरात फुलांची आकर्षक सजावट तसेच विद्युत रोषणाई करण्यात आली होती. त्यासाठी माजी विश्वस्त दिलीप जयसिंगराव धुमाळ व मित्रपरिवारामार्फत नियोजन करण्यात आले.

श्रीक्षेत्र कोडीतची काठी-पालखी घेऊन सर्व ग्रामस्थ मंडळी सायंकाळी पावणेआठ वाजता श्रीक्षेत्र वीर येथे आली. या वेळी देवाची धुपारती घेऊन मुकादम-पाटील, विश्वस्त, मानकरी, दागिनदार, सालकरी, ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत त्यांची सन्मानाने भेटाभेट झाली. पारंपरिक वाद्यांच्या गजरात स्वागत करण्यात आले. त्यानंतर काठी-पालखी तळावर स्थानापन्न झाली. रात्री ११



वाजता समस्त राऊत मंडळींच्या वतीने देवाला पोशाख करून देव-देवतांना विवाह सोहळ्यासाठी आवाहन करण्यात आले. श्रीनाथ म्हस्कोबा देवाच्या पालखीत उत्सवमूर्ती ठेवून ढोल-ताशांच्या गजरात तसेच कोडीतची पालखी बाहेरून अंधारचिंच येथे गेल्या. त्यावेळी मानकर्यांना (शिंगाडे, तरडे, बुरुंगले, व्हटकर, ढवाण) फुलांच्या माळा घालण्यात आल्या. वाई व कण्हेरी पालख्यासह काठ्यांची भेटाभेट होऊन सर्व पालख्या देऊळवाड्यात आल्या.

एक मंदिर प्रदक्षिणा झाल्यानंतर चंद्रकांत ज्ञानोबा धुमाळ (मुकादम पाटील) यांच्या हस्ते विधिवत मंत्रोपचार झाले. मध्यरात्री पावणेतीन वाजता लग्नविधीला सुरुवात होऊन मुकादम पाटील, पुरोहित, गुरव, मानकरी यांच्या उपस्थितीत मंगलाष्टके झाली. २ वाजून ५५ मिनिटांनी लग्नसोहळा पार पडला. या वेळी मंदिराबाहेर लाखो भाविक उपस्थित होते. विद्युत रोषणाई कैलास औसक, बडदे, डी. एस. लाईट पुणे, एस. आर. लाईट, नितीन शेंडकर पुणे, कुंडलिक कांदळकर, जोगेश्वर, शिवशक्ती, स्पार्क, एस. के. साम्राज्य लाईट यांच्यामार्फत करण्यात आली. मिथुन धुमाळ यांनी सहकार्य केले. फटाक्यांची आतषबाजी स्वप्निल हरकळ (विघ्नहर्ता डेकोरेटर्स, पुणे) व विकास शिंगाडे, प्रशांत साळुंखे यांनी केली. जनरेटर सुविधा राहुल वाल्हेकर यांनी केली. दीपक थिटे, संतोष थिटे, नंदकुमार थिटे, श्रीकांत थिटे, किशोर थिटे यांनी पौरोहित्य केले.